मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका

कै. गो. रा. दोडके स्मृति--अंक

या अंकात

कै. गोविंदराव दोडके यांचे अंतरंग त्यांच्या लेखनातून

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २०] फेब्रुवारी १९६६ [अंक ९

स्मृ ति सौ र भ

रे हृदया! राहि शांत!

रे हृदया! राहि शांत!
कानोसा घेत फिरे मृत्यु सदा भवताली—
कधि चाहुल ये कानी, नीरव कधि पदचाली!
टपकन तो नेइ कुणा! —
नेऊ सुखे, काय खंत? रे हृदया! ॥१॥
ऐकु येती हंबरडे, मूक रुदन, शोक–व्यथा!
रोज घरोघरी ऐकू येत करुणा भावकथा!
दुःख असे जरि विशाल—
तरिही ते खास सांत! —रे हृदया! ॥२॥
आणितसे काळ जगीं दुःख, हरूनिही नेई!
दुःख रडवि जीवाते, दुःखच दुःखा खाई!
का भीसी मग जीवा—
मलिन जरी आसंमत? —रे हृदया! ॥३॥
काळोखी रात्र असो लांब किती, तीहि विरे!
कृष्ण कुटिल मेघ जरी दीर्घ काल तोहि नुरे!
—नभ नसे सदा उदास! —
मुळिही नको 'हाय–हंत'! —रे हृदया! ॥४॥

गो. रा. दोडके

'युगवाणी' १९४६ एप्रिल

अनुक्रमणिका

संपादकीय

३१ जानेवारी १९६३ ला विदर्भातील ख्यातनाम साहित्यिक श्री. गो. रा. दोडके यांचे निधन झाले. आपल्या हातात पडणारा फेब्रुवारी महिन्याचा अंक दोडके स्मृति अंक आहे. दोडक्यांच्या हयातीत एक रसज्ञ मर्मज्ञ साहित्यिक असा त्यांच्या नावाचा साऱ्या महाराष्ट्रभर बोलबाला झाला होता. एक प्रसन्न वृत्तीचा अभिजात लघुनिबंधकार आणि एक वैशिष्टचपूर्ण कथाकार असा यांचा लौकिक होता. अर्थात गोविंदरावांच्या प्रतिभेला नाटक आणि कादंबरी हे साहित्य प्रकार वगळले तर कुठलाही 'अविषय' नव्हता. त्यांच्या प्रतिभेला फार मोठा कॅनव्हास मानवणारा नव्हता. कारण स्वच्छंदी भ्रमराप्रमाणं जिथं जिथं कलागुण आढळतील ते टिपून घ्यावे आणि अभिजात म्हणून जे जे काही असेल त्याची उपासना करावी अशा मताचे ते होते. लेखनापेक्षा वाचनाची आवड त्यांना जास्त होती. खेळत खेळत लिहावे पण लिहिण्याशी प्रतारणा होणार नाही इतपत लिहावे; असा त्यांच्या मनाचा स्वाभाविक कल होता. त्यांच्या प्रसन्न आदरणीय कलाप्रेमी अंतःकरणाचा विलास म्हणजे त्यांचे लेखन. त्यांच्या निरागस सूक्ष्मदर्शी अभिजात व्यक्तिमत्त्वाचा मागोवा त्यांच्या त्रुटित लेखनातून घेण्याचा प्रयत्न ह्या अंकात केलेला आहे. लेखकाचे अंतरंग त्याच्या स्वतःच्या विखुरलेल्या लेखनातून काही निवडक लेख घेऊन उपलब्ध करून देता यावे ही मनिषा अंतरंगी बाळगून हा खटाटोप केलेला आहे.

गोविंदरावांच्या लघुनिबंधाचे दोन आणि लघुकथांचे दोन असे संग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या लघुनिबंधाचा संग्रह प्रसिद्ध होण्यापूर्वी श्री. वि. स. खांडेकर यांनी संपादित केलेल्या 'पारिजात' या लघुनिबंध संग्रहात त्यांचे तीन लघुनिबंध समाविष्ट होते. त्यांचा दुसरा लघुनिबंधसंग्रह 'गाभारा' त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झाला. त्यांचे बहुतांशी लेखन मासिकातून, साप्ताहिकातून विखुरलेले आहे. पण संग्रहीत फार थोडे आहे. त्यांच्या लेखनाची एक सर्वसाधारण सूची तयार करण्याचाही प्रयत्न इथे करण्यात आला आहे. इच्छा ही की ते सर्व लेखन संग्रहीत करता यावे. संपादक, प्रकाशकांशी एक छोटासा पत्रव्यवहारही सो‍ दिला आहे. त्याला जोडून १९४० सालामध्ये त्यांनी वाचलेल्या ग्रंथांची एक य जोडली आहे. ह्या सर्व साधनाद्वारे गोविंदरावांचे व्यक्तिमत्त्व अल्पप्रमाणात होईना साकार व्हावे हा हेतू.

शेवटी परिचयात्मक लेख वानगीदाखल आहेत हे रसिकांस सांगणे नलगे. लेखनसहकार्याबद्दल सर्व सुहृदांचे आभार.

चिमणी असते तर ?

असते सखया चिमणी मी जर खोली माजी तुझ्या
घरटे बांधुन नानापरिचि केली असती मजा.
नजर सदा रोखून तुझ्यावर लकेर ओठातिल
ऐकत बसल्ये असत्ये गाणीं गोड तुझी प्रेमळ ॥ १ ॥

कधीकधी हृद्वीत गाउनी भाव तुझ्या मानसी
निर्मियला मी सुरेख असता "काय हीच प्रेयसी" ?
आणुनि हिरवा चारा भूवर कधी कधी टाकुनी
हसल्ये असते मनाशीच मी राग तुझा पाहुनी ॥ २ ॥

हरळी उचलुन दूर फेकली असती तू जेधवा
पुन्हा आणिली असती सारी, जमवुनि अमुचा थवा,
कुठवर असले खेळ ? जोंवरी बघुनि आमुच्याकडे
हास्य चिमुकले निर्बलतेचे गालि न तुझिया चढे ? ॥ ३ ॥

ग्रंथ कधी तू वाचित असता " चिव चिव चिव " बोलुनी
दिधला असता प्रताप तुला मी; धोंडे तूं फेकुनी
मला मारिता उडून गेल्ये असत्ये खांदीवरी
तल्लिन होता, परतून पुन्हा आल्ये असत्ये परी ॥४ ॥

" शूं शूं " करुनी " उगी रहा ग, ओरडसी कासया ?"
वाचायाचा ग्रंथ थोरला काय दिसेना बया ?
असले वदता अथवा " वेडी तरि न गप्प राहत्ये,"
वेड खरे इतरा, न परी ते वेडयाला वाटते ॥ ५ ॥

तू रागावुन गेला असता निघून रे जेधवा
रडल्ये असत्ये मुक्तकंठ मी गाळुनियां आसवां
येतांना तुज पुन्हा बघुनिया हंसल्ये असत्ये मनीं
शांत राहिल्ये असत्यें सारे वेड सख्या विसरुनी ॥ ६ ॥

गो. रा. दोडके
नागपूर

गोविंदराव दोडके–मला दिसले तसे

शरच्चंद्र मुक्तिबोध

एक फिरस्ता. खादीची टोपी, आखुड धोतर, जाडाभरडा कोट, पायात वाहाणा, आपल्याच तंद्रीत सतत पायपिटी करणारी व्यक्ति. ठरीव मार्गावर नित्य दिसणारी. बरोबर कुणी असले तर ते बोलताहेत, ही मूर्ति ऐकते आहे, सिगारेटचा धूर सोडीत मान डोलावते आहे, असेच दृश्य दिसायचे. वर्षानुवर्षे दिसणारे हे दृश्य, त्यात खंड पडू शकेल असे कुणाला वाटायचे कारण नव्हते. पण एके दिवशी त्यात खंड पडला. गोविंदरावांच्या निधनाची वार्ता नागपुरात पसरली. मित्र रडले, इतरांना दु:ख झाले. पानठेलेवाल्यांपासून सारे हळहळले.

तसे गोविंदरावांनी कुणासाठी काहीच केले नव्हते. म्हणजे केले पुष्कळ असेल पण ते सहज म्हणून अगदी जाताजाता केले. त्याची त्यांनी जाणीव बाळगली नव्हती. त्यांनी निरनिराळ्या संस्थांमधूनही कार्य केले. तेही ओघाने आले म्हणूनच एरवी गोविंदराव काही विशेष असे करायला निघालेच नव्हते. आपण पुढे गेले पाहिजे, काही तरी केले पाहिजे, लोकांनी ते मानले पाहिजे, अशी आस गोविंदरावांना मुळातच नव्हती. वाङमयाच्या क्षेत्रात एवढाले वाद माजले, नवे पुढे आले, जुने थोडे जुने झाले. पण गोविंदरावांनी त्याची फारशी दखल घेतली नाही. एवढाल्या राजकीय चळवळी उलथापालथी झाल्या पण गोविंदरावांनी कशाचे कडाडून समर्थन केले नाही की कशाचा तीव्र निषेधही केला नाही. जास्त गडवड दिसली की बाजूला उभे राहून मान उंच करून त्या गडवडीकडे सिगारेटच्या धुरातून निरखून पाहत. मग स्वत:शीच पुटपुटत; आपल्या वाटेने चालू लागत.

खरे असे आहे की गोविंदराव हा चारचौघांपेक्षा वेगळ्या प्रकारचा माणूस होता. तो एक खराखुरा फकीर होता. फकिराच्या अलिप्त, स्वतंत्र वृत्तीनेच ते जगला. संसाराचा पाश लावून घेतला नाही, समाजाच्या पाशाचा स्वीकार केला नाही. जीवनात फक्त 'असण्याची'च मौज गोविंदरावांनी खूप अनुभविली, त्यांना कमी काय होते ? सकाळ होती, संध्याकाळ होती. उत्कृष्ट इंग्रजी–मराठी–चित्रपट होते, भटकायला मित्र होते आणि पुन्हा जगातले श्रेष्ठ वाङमय होते. ज्यांच्यावर काही संस्कार करावा, माया करावी अशी बालमने होती...जगाची मजा पाहत-पाहत गोविंदराव निघून गेले. खेद करताना, तक्रार करताना, निंदा नालस्ती

करताना त्यांना कधी कुणी पाहिले नसेल. क्षुद्र अहंभावापासून ते सर्वदा मुक्त होते. लघुनिबंध लिहिले, ते लिहावेसे वाटले म्हणून. कामे केली, ती आवडली म्हणून. त्यांची चर्चा अशी त्यांनी फारशी कधी केलीच नाही. सारे स्वांतः सुखाय केलेले. करताना आनंद झाला एवढेंच बस झाले. गोविंदरावांनी सिगारेटीसारखे आपल्या वाटचाचे दिवस मजेत फुंकून टाकले. या साध्यासुध्या प्रेमळ व सनकी फकिराने आपल्या नुसत्या अस्तित्वानेच सभोवार अशी प्रेमळ प्रभा पसरली होती की त्याचे अस्तित्व हाच त्यांनी जगावर केलेला एक उपकार होता. अशी माणसे विरळा.

गोविंदरावांच्या गुणांचे चीज झाले नाही, असे त्यांच्या मित्रांना वाटते. त्यांना मायेचे माणूस मिळाले नाही, त्यांच्या वाङ्मयाचा गाजावाजा झाला नाही असेही कोणी म्हणतात. मनापासून हळहळतात. पण मला वाटते गोविंदराव हा नकळत सुद्धा कीव करण्याजोगा माणूस नव्हता. गाजावाजा झाला नाही म्हणून गोविंदरावांची कीव काय म्हणून ? आपल्या फूटपट्टयांनी आपण गोविंदरावांना का मोजावे ? गोविंदरावाला या गोष्टीचे फारसे महत्त्व नव्हते. वाटल्यास रसिकांचीच कीव करावी. कारण त्यात नुकसान त्यांचेच झाले आहे, गोविंदरावांचे नव्हे. त्यांचे सत्कार वगैरे झाले असते तर शरदबाबूंप्रमाणे गोविंदरावसुद्धा अक्षरशः पिळून गेले असते. अध्यक्षीय हास्य तर गोविंदरावांना कधीच जमले नसते. प्रतिष्ठितपणाचा डगला चढवून गोविंदरावांना दोन पावले टाकणेही अशक्य होते. कारण त्यांची ती भूमिकाच नव्हती. चार चौघात बसून जगाची मौज पाहण्यात त्यांना गंमत वाटे. फकिरीची अलिप्त वृत्तीच त्यांना प्रिय होती. जीवनाच्या कुठल्याही साच्यात सापडणे त्यांना मंजूर नव्हते. जीवनाचा आस्वाद घ्यावयाचा, त्यावर प्रेम करावयाचे, पण स्वतः मात्र त्यात सापडावयाचे नाही. मनाने सडे-फटिंगच राहावयाचे, असा गोविंदरावांचा अजब खाक्या होता.

गोविंदराव हा एक बालहृदयाचा अस्सल कलावंत होता. त्याचे हृदय पाहायचे तर त्याच्या चेकोव्हसारख्या लहानलहान गोष्टींमधून पाहावे. गोविंदरावाचे मित्रमंडळ फार मोठे होते, आणि त्यांच्या जीवनात ते पूर्णपणे मिसळून गेले होते.

वाङ्मयाचा तात्त्विक काथ्याकूट गोविंदरावांनी कधीच केला नाही. त्यांची वृत्ति अस्सल रसिकाची होती. पृथःकरणात्मक नव्हती. ते मुख्यतः भावनाप्रधान होते. पुस्तकाचे सतत वाचन हेच त्यांचे एक व्यसन होते. एकाच वेळा त्यांचे अनेक पुस्तकांचे वाचन चालू असे. स्वतः विकत घेतलेली अनेक पुस्तके समोर असायची, लहर लागेल ते पुस्तक हाती घ्यायचे, त्याची थोडी चव घ्यायची, व मग ते पुस्तक ठेवून द्यायचे, मग दुसरे पुस्तक. अशी चवीचवीने पुरवून पुरवून त्यांनी पुस्तके वाचली. अशी त्यांची वृत्ती. या पद्धतीने त्यांनी जगातील सर्व उत्कृष्ट वाङ्मय आत्मसात केले होते. अमुकच वाङ्मयप्रकार त्यांचा आवडता होता अशातला भाग

नव्हता. कादंबऱ्यांबरोबर चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने यांचेही त्यांना समा
आकर्षण होते. अस्सल वाङ्मय जीवनापेक्षाही अधिक सत्य असते. असे म्हणत
येईल. जागतिक वाङ्मयात जगून गोविंदरावांनी जणू हेच सत्य मिळविले होते
लोक म्हणत--"हा एवढा वाचतो खरा' 'पण ते सारे जाते कुठे? याच
बोलण्यात तर ते दिसत नाही." वाङमयीन सत्याने त्यांना जीवनाचे तारतम्
शिकविले होते. अलिप्त व सहानुभूतिशील बनविले होते. स्वतःच्या भावभावनांत
गुरफटून न राहण्याची कला त्यांना त्यामुळेच साधली होती. ते वाङ्मय त्यांच्य
मनात मुरले होते आणि वृत्तीत जिरले होते. आणि त्यामुळेच, एखादा श्रेष्ठ विचा
जसा साधा असतो, तसा साधेपणा गोविंदरावांचा देहस्वभावच बनून गेला होता
असा माणूस पुन्हा दिसणे अशक्य. त्यांचे वाङमय तर कायम राहिलच परंतु ते
व्यक्तित्व विस्मृत होऊ शकणार नाही. मान खाली घालून, सिगारेट ओढीत
रसत्याच्या कडेकडेने भर वेगात जाणारी गोविंदरावांची मूर्ति विसरणे
कुणाला शक्य आहे?

रात्र चांदणी असली, चंद्राचा प्रकाश आसमंतावर पसरलेला असला की मला तो एक सोहळाच वाटतो. पण आजची रात्र वर्षाकाळातली आहे. आज आहे वटपौर्णिमा. सायंकाळपावेतो आकाशात मेघ होते, दाट होते. पण ते पांगले, आकाशात अजूनही तुरळक मेघ आहेत. पण ते मेघ शुभ्र आहेत. ते चंद्राजवळ नाहीत. तो आज सोळा कळांनी धरतीवर अमृत-सिंचन करतो आहे. या दिवसात आजच्यासारखी रात्र तर पाहिल्याचं मला आठवत नाही., ही एक क्वचितच लाभणारी पर्वणी आहे.

वारा वाहतो आहे. सोसाट्याचा आहे. किनाऱ्यावर उभं असतांना लाटांवर लाटा अंगावर याव्या त्याप्रमाणे झुळुका अंगावर येताहेत. घन आहेत त्या शीतल आहेत. स्निग्ध आहेत. भोवताली वृक्षराजी आहे. वारा पानं वाजवतो नंतर नाद मंदावतो, पुन्हा मोठमोठ्याने झुळझुळाट होतो. हेच पुन्हापुन्हा आणि यामुळे समुद्राच्या किनाऱ्यावर जाऊन उभं राहण्याची इच्छा उसळी मारून मनात येते. थोड्या वेळानंतर आपण कुठे आहोत याचीही जाणीव मनातून नाहिशी होते. आणि विशाल दृश्य डोळ्यासमोर उभं राहतं. समुद्र किनारा, किनाऱ्याकडे धावत येणाऱ्या लाटा, जलाशयावर पडलेला चंद्रप्रकाश क्षितिजरेषेवर झालेलं आकाश आणि समुद्राचं मीलन आणि मनाशी हे बघता बघता दत्तांची आठवण होते आणि त्यांच्या 'बघुनि मन धाले, साकल्य दृष्टिचे झाले' या ओळीची.

रसिक सुहृद गोविंदराव दोडके

पां. ब. गाडगीळ

ये रंगे बहारे आलम है
क्यौं फिक्र है तुझको अय साकी !
महफिल तो तेरी सूनी न हुवी
कुछ उठ भी गये
कुछ आ भी गय —मजाज़



१२ जुलै १९१० मृत्यु : ३१ जानेवारी १९६३

तारीख ३१ जानेवारी १९६३ रोजी गोविंदराव दोडके यांचे देहावसान झाले. मित्राचा मृत्यु आपल्या सार्वजनिक जीवनात पोकळी निर्माण करतो, विफलता निर्माण करतो याचा प्रत्यय मला माझ्या रसिक स्नेह्याच्या मृत्यूनेच प्रथम आला. माझा जन्म नागपुरातच झाला. शिक्षण आणि व्यवसाय या निमित्ताने माझे आजवरचे आयुष्य नागपुरातच व्यतीत झाले आहे. या उमद्या शहराचा मला अतोनात अभिमान आहे. माझ्या धडपड्या स्वभावामुळे माझ्या सामान्य आयुष्यात मी या नगरीतील राजकीय पक्षोपक्षातील नामवंत कार्यकर्ते, प्रतिभावान् साहित्यकार, कलावंत, अग्रगण्य पत्रकार व सार्वजनिक कार्यकर्ते यांची मैत्री संपादन करू शकलो. या माझ्या अनेक मित्रांत माझ्या दिवंगत मित्राचा फार उशीरा प्रवेश झाला.

खरे म्हणजे त्यांची माझी मैत्री विरोधातून निर्माण झाली. त्यांची माझी वाङमयीन मते कधीच जुळली नाहीत. त्यांचे वाङ्मयीन आदर्श मला नापसंत होते. त्यांचे लेखनहि मला फारसे आवडत नसे. 'वीणा प्रकाशना'तील आमच्या साहित्यिक अड्ड्यावर त्यांची माझी गाठ पडे. एकदा एका वादविवादात मी त्यांच्यावर कडाक्याचा हल्ला चढवला. थोडी वैयक्तिक टीकाहि केली. त्या प्रसंगानंतर मला वाटले की, मला माझ्या मित्राच्या खोलीची दारे कायमची बंद होतील व त्याच्या उत्कृष्ट ग्रंथसंग्रहाला मुकावे लागेल. मी थोडे दिवस जाऊ दिले. मी त्या काळात मायकोव्हस्कीच्या काव्याचे वाचन करीत होतो. त्याच्या काव्यासंबंधी मला अधिक वाचावयाचे होते. मित्रांनी सांगितले की, गोविंदरावाशिवाय दुसऱ्या कोणाच्याहीकडे तुम्हाला मायकोव्हस्कीवरील पुस्तके मिळणार नाहीत. शेवटी निर्धार करून त्यांच्याकडे गेलो व पुस्तकांची, लेखांची मागणी केली. त्यांनी जुन्या वादाची आठवण न काढता माझी मागणी पुरवली. स्वतः जवळील लेख व मासिके माझ्या स्वाधीन केली. जुन्या भांडणाचा निर्देश नाही, वैयक्तिक टीकेचे स्मरण नाही किंवा वागणुकीत यत्किंचितहि बदल नाही. 'अक्रोधेन क्रोधं जयेत्' हाच त्यांच्या सार्वजनिक आयुष्यातला आचार धर्म होता. त्यांच्या वर्तनात प्रेमळपणा, दिलखुलासपणा आणि सात्विकता होती. ही सात्विकता त्यांच्या जीवनात सर्वत्र भरून राहिली होती. हे उदात्त गुण त्यांच्या अंगी कसे आले असतील याचे मी मनाशी टिपण केले. माझ्या मित्राची निःसीम सौंदर्यासक्ति हेच त्याच्या निर्वैरतेचे, सात्विकतेचे कारण होते. जीवनातील सौंदर्याचा उपभोग घेणाऱ्या त्या रसिकास वाङ्मयीन वादविवादाचे आकर्षण नव्हते. 'बोदलेर'चे रुचिर काव्य वाचण्यात गुंग होणारा, 'ज्याँ ख्रिस्तोफ'चे पुनर्वाचन करण्यात दंग झालेला, अगर रोमाँरोलाँचे पुस्तक वाचण्यात देहभान हरपणारा तो रसिक वादसंगरात कधीच रमला नव्हता. निसर्गातील आणि मानवी जीवनातील जे जे सुंदर ते टिपून घेणारा मधुकर वृत्तीचा रसिक कर्कश चर्चेत कसा बरे आनंद घेणार? Whatever things

are beautiful, think on these हा कार्लाईलचा (की इमर्सनचा ?) आदेश ज्याच्या रोमरोमात भिनलेला आहे तो रसिक वाङ्मयविमर्शापेक्षा वाङ्मय-निर्मितीतच रस घेणार !

गोविंदरावांची साहित्यावर निःसीम भक्ती होती. निरंतर वाचनामुळे त्यांचे हातून लेखन कमी झाले. एखाद्या विषयात नाव मिळवावयाचे झाल्यास मनुष्याला एकचित्त व्हावे लागते. त्या विषयाचा प्रसक्त व्यासंग करून प्रथम श्रेणीची कीर्ति मिळविता येते. परंतु गोविंदरावांसारख्या रसिकास हे अशक्यप्राय होते. साऱ्याच कलांमध्ये गोडी असलेल्या माणसाला एकाच कलेत अभिरुचि ठेवता येत नाही. त्याचे सौंदर्यासक्त मन एकांगी बनू शकत नाही. गोविंदरावांनी काही उत्कृष्ट लघुनिबंध लिहिले आहेत. काही सुंदर कथा आणि नाटिका लिहिलेल्या आहेत. लेखन हा एक व्यवसाय आहे ही भूमिका तर त्यांच्या वृत्तीशी कधीच जुळली नसती 'काव्यं यशसेर्थकृते' मधील 'अर्थकृते'च्या हिशेबी तालावर त्यांची लेखनकला नाचली नाही ही चांगलीच गोष्ट झाली परंतु 'यश'साठीहि त्यांनी फारसे लिहिले नाही. जे लिहिले ते 'स्वान्तःसुखाय'! लेखनाचा खटाटोप करण्यात त्यांनी वेळ घालविला नाही. अनेक विषयांचे वाचन करण्यात त्यांनी जन्म घालवला. एखाद्या विषयात त्यांनी मन घातले असते व त्याच विषयाचा सतत अभ्यास करीत राहिले असते तर त्यांची विद्वान म्हणून कीर्ति खासच झाली असती. परंतु त्यांची अभिजात रसिकताच त्यांना एका विषयाचे चर्वितचर्वण करू देण्यास तयार नव्हती. त्यांचे मधुव्रत वृत्तीचे मन एका विषयावर बसण्यास तयार नव्हते. त्यांना साऱ्या ललित कलांचा ध्यास होता. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतापासून ते छायाचित्र कलेपर्यंत साऱ्या कलांचे ते नादी होते. त्यांचे सौंदर्यशोधक मन जे जे ललित आणि रुचिर त्याचा ध्यास घेत असे. त्यांनी नामांकित गायक ऐकले, त्यांनी उत्कृष्ट संगीत नाटके पाहिली, नागपुरात आलेले सारे उत्कृष्ट इंग्रजी चित्रपट पाहिले आणि त्यावरोबरच नागपुरात आलेल्या प्रख्यात राजकीय पुढाऱ्यांची व्याख्यानेहि ऐकली. त्यांना कोणच्याहि विषयाची नावड नव्हती. अभिजात कलेने आणि अभिजात सारस्वताने त्यांना गुलाम करून टाकले होते.

त्यांचा ग्रंथसंग्रह नमुनेदार होता. मला कवी संदर्भासाठी अडचण आली की मी गोविंदरावांकडे धाव घेई. मला पाहिजे असलेले पुस्तक मला सापडलेच समजा. गोविंदरावांची पुस्तके नसती तर मी अनेक लेख लिहू शकलो नसतो. त्यांच्या ग्रंथसंग्रहात ताजी इंग्रजी पुस्तके तर असतच परंतु काही दुर्मिळ पुस्तकेहि पहायला मिळत. गडकऱ्यांच्या सहीचे एक पुस्तक त्यांच्या संग्रही मी पाहिले होते. जुन्या नाटकांच्या आवृत्त्याहि मी त्यांच्याकडे पाहिल्या होत्या. त्यांच्याकडील पुस्तकात त्या पुस्तकावरील अभिप्रायाची कात्रणेही ठेवलेली असत. John O London's

Weekly, Strand या नियतकालिकांचे अगदी जुने अंकहि त्यांच्या संग्रही होते. जुन्या नामवंत नियतकालिकांप्रमाणेच जुन्या काळचे चित्रसंग्रहहि त्यांच्याजवळ होते. फोटोग्राफीचे उत्कृष्ट बांधणीचे संग्रह त्यांच्या जवळ होते. रंगभूमीचे त्यांना जबरदस्त आकर्षण होते. रंगभूमीच्या तंत्राबद्दलचे उत्कृष्ट इंग्रजी ग्रंथ त्यांनी फार मोठी किंमत देऊन खरीदले होते. नामांकित नटनटींची चरित्रे, आत्मचरित्रे त्यांना फार आवडत असत. मी त्यांना सुप्रसिद्ध रशियन नाटयदिग्दर्शक कॉन्स्टन्टाईन स्टॅनिस्लाव्हस्की यांच्याबद्दल मला वाचायचे आहे म्हटल्याबरोबर त्यांनी मला आपल्या ग्रंथसंग्रहातील उत्कृष्ठ बांधणीचे स्टॅनिस्लाव्हस्कीचे सचित्र आत्मचरित्र काढून दिले. लोर्का या स्पॅनिश कवीच्या कविता मला वाचावयाच्या होत्या आणि त्याचे पुस्तक कुठे मिळेल अशी मी त्यांना पृच्छा करिताच त्यांनी मला त्या कवीच्या कवितेची दुर्मिळ आवृत्ति काढून दिली. अशा अनेक गोष्टी मला लिहिता येतील त्यासाठी ' युगवाणी 'चा एक अंकहि पुरणार नाही.

गोविंदरावांचे साऱ्याच वाङमयप्रकारांवर प्रेम होते. परंतु माझ्या मते त्यांना लघुनिबंध, चरित्रे, आत्मचरित्रे आणि प्रवासवर्णने वाचण्याची जास्त गोडी होती. लघुनिबंध प्रकार त्यांच्या मनोवृत्तीला साजेसाच होता. त्यांच्या काव्यात्म प्रकृतीला लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार शोभणारा होता. चमकदार कल्पना आपल्या चित्रमयी शैलीत गुंफणे त्यांच्या कविमनाला आवडणारे होते. मधुर वृत्तींच्या रसिकाला हा वाङ्मयप्रकार आवडणे अगदी साहजिकच होते. चमकदार प्रतिमा, उत्कट अनुभवांची नोंद, स्वैर झोके घेणाऱ्या नाजूक पिसासारख्या कल्पना गुंफण्यासाठी गद्यात लघुनिबंध हाच एक वाङ्मयप्रकार आहे. त्यांचे काही लघुनिबंध निरनिराळ्या संग्रहांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

प्रवासवर्णने वाचण्याची गोविंदरावांना अनिवार हौस होती. एरव्ही नागपूरच्या कोणत्याही रस्त्यावर अंगात एक खादी कोट, हातात काठी, डाव्या हातात सिगरेट आणि खाकेत एखादे नुकतेच विकत घेतलेले पुस्तक अशा वेषात ग्रंथालयाकडे जाणारे गोविंदराव किंवा याच पोषाखात एखादा उत्कृष्ठ चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षागृहात बसलेले गोविंदराव, रंगमंदिरात हजेरी लावण्यासाठी आलेले गोविंदराव, अनेकांनी पाहिले असतील. रोज संध्याकाळी कुठे नसले तरी एखाद्या हॉटेलात हातातील मासिक अगर पुस्तक चाळीत धूम्रपानासमवेत चहाचे घुटके घेत बसलेले गोविंदराव अनेकांनी पाहिले असतील. आमच्या वस्तीतील प्रत्येक सुशिक्षितास त्यांची माहिती होती. परंतु गोविंदराव त्या वेळेस मनाने कुठे असत ? त्या वेळेस कदाचित् ते मास्कोमधील अरबात पथावरचे पिवळे दिवे पाहात असतील, कदाचित ते मनाने व्हेनिसमधील काळ्या गोंडोलातून प्रवास करीत असतील, कदाचित् पॅरिसच्या लॅटिन क्वार्टरमध्ये अगर माँतपार्नासमध्ये कलावंतांच्या

माऊगर्दीत मिसळले असतील; कोणास ठाऊक ते पॅरिसच्या शाँ एलिसी वरून अगर बर्लिनच्या उंटर डन् लिंडन पथावरून सहज फेरफटका करीत असतील, नाही तर सीन नदीच्या अगर डॅन्यूबच्या किनाऱ्यावर पुस्तक वाचीत बसलेले असतील; कोणास ठाऊक कदाचित् हाईन कवीच्या हायडल्बर्ग परगण्यातील वनश्रीचे दर्शन घेत असतील. किंवा गटे अगर शिलरच्या पुतळ्यासमोरील चौकात उभे असतील. प्रवासवृत्तांचे (travelogues) गोविंदरावांना अतिशय वेड होते. कोणाला असे वाटेल की, प्रवासवर्णने वाचणारा हा गृहस्थ स्वतः खूप प्रवास करीत असेल. पैशाची ददात नव्हती पण गोविंदरावांनी प्रवास केल्याचे मला तरी माहीत नाही. कदाचित् ज्या नगरांची वर्णने आपण वाचली आहेत त्यांच्याबद्दल Yarrow Visited या कवितेसारखा अनुभव येऊ नये म्हणूनही त्यांनी फारसा प्रवास केला नसावा.

असा हा माझा रसिक मित्र दिवंगत होऊन आता तीन वर्षे होत आहेत, परंतु त्याची आठवण रोज होत असते. जनतेची स्मरणशक्ती फार दुबळी असते असे म्हणतात आणि ते खरेही आहे. परंतु गोविंदरावांसारखे आपल्या शांत, प्रमळ स्वभावाने अनेकांची मने जिंकणारे स्नेही त्यांच्या मित्रांच्या स्मृतीत सुकून जातील हे शक्य नाही. तीन वर्षे लोटली परंतु अजूनही त्यांच्या मामाच्या घरातील ती चिंचोळी खोली, त्या खोलीच्या दोन्ही अंगांना लागलेल्या त्या ग्रंथांच्या ओळी, गटेच्या बस्टचे छायाचित्र, रोमाँ रोलाँ आणि शरच्चंद्र यांच्या तसविरी आणि आरामखुर्चीत बसून धूम्रपान करीत प्रिचेटचे 'स्पॅनिश टेस्टामेंट' वाचीत बसलेले गोविंदराव माझ्या दृष्टीसमोर दिसत आहेत. याच खोलीच्या मंद उजेडात मी अनेक रशियन कवींच्या कविता वाचल्या आहेत. याच खोलीत बसून जगातील नामवंत छायाचित्रकारांनी काढलेली उत्कृष्ट छायाचित्रे पाहिली आहेत. याच खोलीत बसून टोलरचे, कोएस्लरचे, स्पेंडरचे आत्मचरित्र मी वाचलेले आहे. याच खोलीत बसून 'लंडन टाईम्स सप्लिमेंट'मधील अगर 'लिसनर'मधील परीक्षणे वाचली आहेत. याच खोलीत बसून समाजवादासंबंधी शिरा ताणून मी वाद घातलेला आहे आणि याच खोलीत बसून त्या रसिक मित्राच्या आणि त्याने जतन केलेल्या अभिजात ग्रंथांच्या अंतरंगाचा शोध घेण्याचा मी प्रयत्न केलेले आहे. याच खोलीत बसून पालमाल, थ्रीकॅसल्स सिगरेटच्या पाकिटांचा फडशा पाडीत 'काव्यशास्त्र विनोदा'त तास न् तास घालविले आहेत. या स्मृती शिळ्या कशा होतील ?

———

अनुक्रमणिका

गोविंदरावांची स्वाक्षरी

शान्ताराम

कै. गोविंदराव दोडक्यांच्या स्मृतीला मुजरा करावा म्हणून त्यांचा 'माहेरवाशीण' हा लघुनिबंधसंग्रह मी पुन्हा एकदा वाचून काढला. गोविंदरावांचे लघुनिबंध आणि ओळखीचं असं त्यांचं व्यक्तित्व यांचे परस्परसंबंध कसे आहेत आणि किती मनोरम आहेत, गोविंदरावांच्या लघुनिबंधांचं स्वरूप काय आहे, हे प्रश्न पुन्हा एकदा मनात आले. काही विचारांची, काही मतांची उजळणी झाली. पण यावेळी त्यांचे लघुनिबंध वाचताना एक नवी जाणीव झाली. कदाचित् जुनी सुखद जाणीव नव्या शब्दात प्रगटली असेल. तसंहि असेल. पण या वाचनाचा अनुभव आला त्यात सांगण्यासारखं काही आहे व ते कोवळच्या प्रकाशासारखं पण स्पष्ट आहे असं वाटलं.

पहिल्या वाचनाइतकंच हे पुनर्वाचन आवडलं. सर्वसामान्यपणे असं घडत नाही. एखाद्या पुस्तकाची एकूण महत्ता पटत असतानाहि त्याचं पुनर्वाचन पहिला आनंद देत नाही. गोविंदरावांचे निबंध वाचताना ताजेपणाचा अनुभव येत होता यात शंका नाही. हा ताजेपणा कशात आहे? त्यांच्या लघुनिबंधांच्या साध्या लोभस रूपात? त्या लघुनिबंधांच्या मागे असलेल्या आज डोळ्यांना न दिसणाऱ्या—सुसंस्कृत, संयत, प्रसन्न, सहृदय व्यक्तित्वात? हे धागे एकमेकाशी असे एकजीव झालेले असतात की एक दुसऱ्यापासून तसा वेगळा करता येत नाही. तसं करायचं म्हटलं तर नजरेला एक विशिष्ट भूमिका घ्यावी लागते--मुद्दाम घ्यावी लागते. डोळे फाडावे तर लागतातच पण तसं करतांना डोळ्यापुढील स्तूची तुसं निघतात ती वेगळीच.

गोविंदरावांच्या लघुनिबंधात आढळणाऱ्या या ताजेपणाचं रहस्य कशात आहे? रहस्य म्हणता येईल इतकं ते गूढ नाही. मुद्दाम शोधून काढायची तिथं गरज नाही, लघुनिबंधाचे विषय, त्यांची अभिव्यक्ति, त्या अभिव्यक्तीतून उमटणारं लेखकाचं व्यक्तित्व असे निरनिराळे धागे वेगळे न केल्यास सलग अनुभवास येणारं ते रहस्य—वैशिष्टच--म्हणजे गोविंदरावांचं गद्य. त्यांच्या लिखाणातला ताजेपणा त्यांच्या गद्याच्या शैलीत आहे. स्वतंत्रपणे थोडी दखल घ्यावी असे विशेष त्या शैलीत आहेत. त्या शैलीचं निश्चित वर्णन करण्यासाठी शुद्ध, सोज्वळ, निखालस, निर्मळ यापैकी कोणतंहि एक विशेषण पुरणार नाही. म्हणजे ही सगळी विशेषणं पचवून टाकणारी लोकविलक्षण शैली त्यांची होती अस

मला निश्चितच सुचवायचं नाही. परंतु या सगळ्या विशेषणांना सामान्य असा जो कोणता गुण असेल तिचा स्पष्ट स्पर्श त्या शैलीला झालेला आहे. "...जीवनाच्या धकाधकीत मी पडलो नव्हतो तेव्हा मला स्वैर मनाने आयुष्याचा उपभोग घेता येत होता. शहराचा संपर्क सोडून गावाबाहेर भटकत फिरण्याची, आपल्या मनाने सृष्टि वोलकी करण्याची, तिचा आनंद बघता बघता रमून जायची, ऋतूंबरोबर पालटणाऱ्या दृश्यांची, गंधांची मौज लुटायची वृत्ती माझ्या ठिकाणी होती. परंतु आज त्या काळाला म्हातारं स्वरूप प्राप्त झालं होतं. तो माझ्या आयुष्यात कधीतरी होता त्याची स्मृती पुसट देखील मला उरली नव्हती." आऽऽऽये होऽऽ वसंऽऽत या निबंधातला हा उतारा काय किंवा कुठल्याहि निबंधातला एखादा परिच्छेद घेतला काय ती शैली हाताला लागल्याशिवाय राहत नाही....
"समोवार सूर्याचा लख्ख प्रकाश पडलेला असताना आमच्या घड्याळीत त्या वेळी अमेरिका खंड असेल. उत्तरध्रुवावर सहा महिने रात्र आणि सहा महिने दिवस असतो. सृष्टिनियमांप्रमाणे ही क्रिया होते. माझ्या घड्याळीत ह्या सुट्यांच्या दिवसात रात्र आहे की दिवस हे कुणाला कळायचं नाही मुळी. पुन्हा होणाऱ्या हालचालीचे परमेश्वर अस्मादिकच." कॅलेंडर, घड्याळ आणि पुस्तके यातहि शैली तीच. फक्त तिची वीण इथं थोडी सैल आहे. बाकी ताणाबाणा तोच.

शैलीचा जो सच्चेपणा जाणवतो तो अर्थात् शाब्दिक शुद्धतेचा नव्हे. 'सुहावनी,' 'unearned income' असे शब्द गोविंदरावांच्या लिहिण्यात सहज येतात—जितक्या सहजतेनं संस्कृत शब्द येतात तितक्या शब्दांच्या कपाळावर सांस्कृतिक गंध आहे किंवा यावनी पांढरा फटफटीतपणा आहे हे पाहून थबकत थबकत पुढे जाणारी, ती शैली नव्हे. शब्द घरचा की बाहेरचा, नवा की जुना असा अदमास घेत, अडखळत पुढे जाणारी ही शैली नव्हे. 'जीवभारणी,' 'ठेवणी' असे शब्द डोळ्यात भरत असले तरी या शैलीचं महत्त्व केवळ शब्दांच्या निवडीपुरतं मर्यादित नाही.

शैलीचा निर्मळपणा, किंवा सोज्वळता इथे आहे. पण तिचा सोवळेपणाशी संबंध नाही. सुसंस्कृत संयमित स्वभावाच्या खुणा आहेत. ती मोठ्या गोड-पणाने हसत हसत मला विचारीत असे, "कां हो ! शेक्सपिअरच्या नाटकांचा कर्ता कोण बरं ?"

आणि जर गटे तिला म्हणाला असता, "गो. रा. दोडके" तर माझी खात्री आहे की मोठ्या आदराने व गोड स्मित कपोलावरून ओसरू न देता ती म्हणाली असती, "अस्सं ! !" असा प्रसंग किंवा

"मला वाटत होतं की आपण मुलींशी बोलू शकणार नाही, संकोच वाटेल. परंतु माझ्या स्वभावाची निराळीच बाजू मला कळून आली." अशी संयत वाक्यं

का र ण

बाजारात महाराष्ट्र सारस्वताची नवीन प्रत आली मात्र आणि ती विकत घेण्याची मला इच्छा झाली. पण मी सारखा आपल्या इच्छेला मुरड घालत होतो. पुस्तक विकत घ्यायला माझ्याजवळ पैसे नव्हते अशातला भाग नाही. पुष्कळ पैसे होते. पुस्तक विकत घ्यावसं वाटत असूनहि घ्यायचं टाळत होतो.

माझ्याजवळ आधीच महाराष्ट्र सारस्वताचे दोन्ही भाग होते. जुने होते. कोणत्याहि परीक्षेला मी बसणार नव्हतो. त्यामुळे सारस्वताच्या नवीन आवृत्तीची प्रत जर मी विकत घेतल्याचं माझ्या मित्रांना आढळून आलं असतं तर ठराविक शब्दात त्यांनी मला ठराविक लाखोली वाहिली असती. पैसे कशावर खर्च करायचे या बाबतीत अनेकांच्या ठराविक कल्पना असतात. कपड्यावर तुम्ही पैसे खर्च केले तर तुमच्या खर्चिक

गोविंदरावांच्या निबंधात पुष्कळच आढळतात. परंतु 'तरुवरांच्या अर्धचंद्रकोर गोंडेदार जाळीमधून दिसणाऱ्या मालिन डिट्रिचच्या मोहक मुखाप्रमाणे मला ती वाटली,' असं आवश्यक तेव्हा मोकळेपणाचं सांगणाऱ्या 'पलंगावरून......' लिहिणाऱ्या गोविंदरावांच्या शैलीत सोज्वळता आहे या गोष्टीचं स्तोम माजवायचं कारण नाही. 'माहेरवाशिणीत' नसलं तरी गोविंदरावांच्या इतर लिखाणात 'रांडलेकानं वजीस ठेवलं' असं वाक्यं भीडभाड न ठेवता शिरत असे. तेव्हा या शैलीचा निखालसपणा म्हणजे सोवळेपणा नव्हे.

गोविंदरावांच्या शैलीच्या काही खुणा त्यांच्या गद्याच्या ठेवणीत आहेत. कधी कधी ही ठेवण चर्मचक्षूंना जाणवेल एवढी स्पष्ट असते. उदाहरणार्थ,

"रात्र.

..आणि तीहि मावळत्या वर्षाकाळातली.

'शरदृतु उदय चंद्राचा' म्हणून प्रसन्न आणि जीवभाव हरपून घेणारी.

.गंधागंधांनी युक्त म्हणून वृत्ति बहरून टाकणारी.

दुग्धधवल म्हणून सुखविणारी."

ही 'निदान नावं ठेवताना तरी' ..या निबंधाची सुरवात किंवा 'भवितव्यची'

"आणि असं असूनहि.

"आपलं भवितव्य आपल्याला माहीत असतं तर ?" असे उद्‌गार मनुष्य प्रत्यहि काढतोच.

"पण तीमधील विदारकता मी स्वतःच्या व इतरांच्या अनुभवाने जाणली आहे. म्हणूनच मला वाटतं भवितव्याचं आकलन आपल्याला होत नाही ही गोष्ट सुखाची आहे. जग सुखी आहे कारण भवितव्याविषयी त्याला ज्ञान नाही. मृत्यूची देखील मनुष्य फारशी काळजी वाहात नाही. कारण दैनंदिनीमध्ये त्याच्या आगमनाची तारीख नोंदून ठेवलेली नसते म्हणून."

ही अखेरी किंवा 'रोजनिशी' या निबंधाची सबंध बांधणी पाहताच गोविंदरावांच्या शैलीचा अर्थ लागतो. त्यांच्या निबंधात कवितेचे कातळ असल्यामुळेच सतत ताजेपणा, गारवा यांचा अनुभव, वाचकाच्या मनाला येत असतो.

बहुतेक लघुनिबंधात असतो तसा लहान लहान वस्तूंचा संसार त्यांच्याहि निबंधात आहे. एवढंच नव्हे तर "जगाच्या नजरेला क्षुल्लक उपेक्षणीय, वाटणाऱ्या लहान लहान दर्भांकुरांनी वायूवर तरंगणाऱ्या पानापाचोळ्याने, गळून पडलेल्या पंखांनी चिमण्यांचं घरटं तयार होतं, माणसाचं वैयक्तिक जीवन देखील वर सांगितलेल्या व तत्सम गोष्टींनी आणि प्रसंगांनी घडत असतं." असं भाष्य आहे. या लहान गोष्टींचा आणि मोठ्या शैलीचा मेळ कसा घालायचा? शैलीसंबंधी ज्या ज्या महाभागांनी विचार केलेला आहे त्यांनी या ना त्या प्रकारे विषयाच्या मोठेपणाचा उल्लेख केला आहे. तेव्हा गोविंदरावांच्या शैलीचा उलगडा कसा करणार? तिचा मोठेपणा कशात आहे? त्यांच्या लघुनिबंधातल्या विचारात?

गोविंदरावांनी या लघुनिबंधातून तत्वचिंतन भरपूर केलेलं आहे. गटेचा ग्रंथ वाचणारा माणूस तो. तेव्हा नुसत्या काव्यानं त्याची तहान भागणारी नव्हती.

स्वभावाबद्दल तुम्हाला काही दोष देणार नाहीत, रेडिओ जर विकत घेतला तर समाधान व्यक्त करणारे आढळतील. हाच प्रकार इतर काही वस्तूंच्या बाबतीत. परंतु पुस्तकावर झालेला खर्च हा विनाकारण अनाठायी असाच मानण्याचा सर्वसामान्य प्रघात त्यामुळे साहाजिकच "सारस्वत" घ्यायचं मी टाळत होतो. पण एक दिवस बी. ए. च्या परीक्षेला बसणारी माझी भाची मला म्हणाली, "सारस्वताचं नवीन पुस्तक कुठून तरी आणून द्या. कारण त्यातला पुरवणीचा भाग वाचायला हवा," झालं. जर मला कुणी विचारलं "सारस्वत तुझ्याजवळ असताही नवीन पुस्तक कशाला आणलं?" तर त्याचं माझ्या दृष्टीने समर्पक उत्तर द्यायला मला कारण मिळाले. त्याच दिवशी सायंकाळी पुस्तक विक्रेत्याकडे गेलो. सारस्वताला घरी घेऊन आलो. ११-१-५५

त्याच्या शैलीचा प्रमुख आधार वैचारिकता तर नव्हे? त्यांच्या लिखाणात सुंदर विचारांची पखरण आहे आणि भावनेचा ओलावा आहे; या दोहोंचं मनोहर मिश्रण आहे; म्हणून त्यांच्या लघुनिबंधांना उंची प्राप्त झाली आहे, असल्या तऱ्हेच्या विधानात सत्य असलं तरी हे फार ढोबळ होईल. त्या विधानानं त्यांच्या शैलीला न्याय मिळणार नाही. वस्तू, प्रसंग, व्यक्ती यांच्या विषयीची भावना आणि तिच्यातून उत्पन्न होणारं काव्य एकीकडे आणि सुंदर विचार आणि सुंदर अभिव्यक्ति दुसरीकडे अशा दुहेरी आकर्षणात त्यांनी स्वतःच्या व्यक्तित्वाला बुडू दिलं नाही. या आकर्षणाचा स्पर्श आवश्यक तेवढ्या प्रमाणात घेऊन त्यांचं व्यक्तित्व वेगळं राहिलं. त्या वेगळेपणाची साक्ष म्हणजे त्यांची शैली. ती आहे म्हणून त्यांच्या लघुनिबंधांचं महत्त्व. शैलीला महत्त्वाचा विषय लागतो असं जाणते मानतात; तो विषय — मला वाटतं — विचार आणि वस्तू यांचा आस्वाद अनुभव येऊनहि वेगळा राहणारा माणूस हाच असावा. त्या माणसाची सोबत वाचकाला सतत देणारी अशी ती शैली; म्हणूनच तिला शैली म्हणावयाचं.

त्या शैलीच्या मर्यादा स्पष्ट आहेत. तिचा आवाका लहान आहे. जे आहे ते मात्र एकजिनसी, निखालस आहे.

माझ्याजवळ असणाऱ्या माहेरवाशिणीच्या प्रतीवर गोविंदरावांची स्वाक्षरी आहे. अशी प्रत ज्यांच्याजवळ नाही त्यांच्यासाठीहि प्रत्येक लघुनिबंधावर त्यांची स्वाक्षरी आहे—त्यांच्या शैलीची. रागविस्तार फार मोठा नसला तरी जो सूर आहे तो सच्चा आहे. गोविंदरावांच्या लघुनिबंधात वाचकांना वरचेवर आढळणाऱ्या वाचनीयतेची हमी या शैलीच्या सच्चेपणात आहे.

गोविंदराव दोडके—मित्र आणि सहकारी

दि. ब. पंडित

गोविंदराव दोडके यांचे स्मरण त्यांच्या स्नेही वर्गाला होत नाही असा एकतरी दिवस जात असेल की नाही कोण जाणे ! त्यांच्याशी ज्यांचा स्नेह जडला त्यांचा स्नेह कधी तुटला असेल असेहि वाटत नाही. आम्ही तर दोन तपाहून अधिक काळ एकत्र काम केलेले. तेव्हा त्यांच्या कितीतरी संस्मरणांचा कोष आमच्यापाशी संगृहित झालेला आहे. ती संस्मरणे अशी जिवंत आहेत की गोविंदराव आमच्यामध्ये नाहीत ही कल्पनाहि मनात येत नाही. आमची सारी स्मृतीच जणु त्यांच्या अस्तित्वाने परिवेष्टित आहे. म्हणूनच गोविंदराव आज आमच्यात नाहीत हे आठवावे लागते. आठवणे भागच पडते. कारण ते आमच्यात नाहीत हे सत्य आहे. ते कितीहि कटु असले तरी ते मान्य केल्याशिवाय गत्यंतरच नाही.

गोविंदराव दोडके आमचे मित्र होते आणि सहकारी होते. आमच्या शाळेतील सारे सहकारी एकमेकांचे मित्रच असत. काही सहकारी म्हणून मित्र होऊन जात, काही मित्र म्हणून सहकारी होते. गोविंदराव यांचा मित्र आणि सहकारी यातील क्रम कोणता हे सांगणे कठीण आहे. केवळ कालक्रमाने विचार केला तर ते अगोदर मित्र आणि मग सहकारी होते. पण आमच्या जीवनक्रमात या भूमिकांत अशी एकरूपता स्थापन झालेली होती की तेथे कालक्रम व्यर्थ ठरावा. येथे कालक्रमाला स्थान नाही. कारण त्यांचे मित्रत्व आणि सहकार अतूट होता. ते आमचे सहकारी होते याचा अर्थ आम्ही एकत्र एक कार्य करीत होतो येवढा मर्यादित नाही. आमचे कार्य एकदिल असावयाचे आणि कृती समवायाने घडावयाची असा त्याचा अर्थ आहे. या एकरूपतेत आमचा वाटा कमी असे. तर गोविंदरावांचाच बहुतेक वाटा असे. याचा अर्थ त्यांची कृती इतरांच्या अनुवर्ती असे असा मात्र करावयाचा नाही. त्यांची कृती इतक्या नेटक्या प्रमाणात कार्यानुवर्ती असे की त्या कार्यानुरोधाने घडणाऱ्या इतरांच्या कृतीत आणि त्यांच्या कृतीत अंतर पडूच नये. त्या कृती एकमेकींना पोषक आणि पूरकच व्हाव्यात. त्यांच्या कृतींना आमच्या कृतींचा असा लाभ होत असे की नाही कोण जाणे. पण त्यांच्या कृतींनी आमच्या कृतीतील उणीवांची भरपाई व्हावी आणि दोषांचे निराकरण व्हावे हा लाभ आम्हाला नित्य मिळत आला आहे.

कै. गो. रा. दोडके यांचे अंतरंग त्यांच्या लेखनांतून

१. लघुकथा : जगाचा जन्म

बागेतील झाडांकडे बघण्यातच त्याला किती समाधान वाटत होतं ! एक एक झाड फळानं भरलं होतं. फळाच्या भारानं वाकलं होतं. कामटयांच्या आधारानं फांद्या झाडांवर होत्या. बागेत पानं थोडीशीच दिसत होती, नुसत्या फळांचंच झाड दिसे. फळं भरदार, नारिंगी; हिरव्या रंगाचेहि फराटे अजून काही फळांवर होते. फळ बघता बघता पानावरहि त्याचं लक्ष जाई. हिरव्या रंगात काळयाची छटा. फळं सुंदर दिसावी म्हणूनच जणू काय पानं झाडावर होती ! दुपारच्या उन्हात पानं हालत, सूर्य प्रकाशानं चमकत. लहान मुलांचे डोळे त्याच्या दृष्टीसमोर उभे राहत. काळया जमिनीवर लहान लहानशी असंख्य तेजोवलयं पसरली होती. भूमीवर सुंदर विणकाम झालं होतं. प्रत्येक झाडाच्या बुंध्याजवळ वाफा होता. वाफ्यातून दिलेलं पाणी जमिनीत झिरपून गेलं होतं. पाण्यावर आलेला फेस वाफ्याच्या काठाला अजूनहि होता. आईचा स्तन नुकताच सोडलेल्या इवल्याशा ओठांची त्याला आठवण झाली. शिशुवैभवात हुंदडणाऱ्या त्याच्या पोराचं मुखमंडल त्याच्या हृदयाकाशात कोटीसूर्याच्या प्रभेनं तळपलं. तेज मंदावत सौम्य मुखाची, सदा हंसरी त्याची बायको त्याच्या हृदयात मुलाआडून डोकावून गेली. पुन्हा तो बाग व त्यातली फळझाडं बघू लागला. त्याचा गंधरंग सेवू लागला. सायंकाळी बागेत कुठल्या कुठल्या, किती तरी पाखरांचे थवेच्या थवे गोळा होत. फांद्यांवर किलकिल किलकिल करीत, फांद्या हलवीत, त्यांच्यावरची धूळ उडे आणि सगळी झाडं सुवर्णकणांच्या जाळयानं एकमेकात गुंतून जात. त्याच्या मनात अशाच आशा आकांक्षा कुठून कुठून येऊन किलबिलाट करू लागल्या होत्या, त्यांच्या साफल्याचा भास मनांत निर्माण होऊन एक गोड स्वप्न साकार झालं होतं. त्यावरहि सोनेरी आभा पसरली होती.

धप्प ! तो केवढयांदा दचकला ! झाडावरून अजगर तर नाही कोसळला ! एखादा दगड तर नाही पडला कुठून ! तो काय आहे म्हणून भोवताली बघू लागला. एक हिरवे नारिंगी फळ जमिनीवर कोसळलं होतं. त्यावर एक काळा डाग पडलेला होता. त्या डागांतून जमीनीवर रस सांडला होता. तो त्या फळा जवळ जाऊन उभा राहिला. फळाभोवती काही मुंगळयांची धडपड व धावपळ चालली होती. काही त्या फळाखाली चेंगरून मेले होते. काही फळाभोवती सांडलेला रस सारवीत होते. दोनतीन मुंगळे पायात पाय गुंतवून युद्ध करीत होते. बाजूला

एक मुंगळा एकटाच उभा होता. 'प्रेयसी' शब्द त्याच्या मनात आला. हसूहि आलं. फळ जमिनीवर पडून जिथं दुभंग झालं होतं तिथं भेग दिसत होती. भेगेच्या काठावर काही मुंगळे उभे होते. त्याच्या डोळ्यासमोर मूर्ति उभ्या राहिल्या. त्या एंजिनिअरांच्या व प्रवाश्यांच्या मुखातून शब्द गेले. 'कोलोराडो कॅनियन.' त्या फळाच्या दोन ध्रुवांमधील अंतर मुंगळे लीलेनं कापीत. एका मुंगळ्यानं तर मनुष्यप्राणी—मुंगळ्याच्या भाषेत वेगळंच नाव आहे. एखादा मुंगळा ते उच्चारतो, व जवळ असणारे सगळे ते ऐकून हंसत सुटतात—जीवनविकासामध्ये मनुष्य मुंगळ्याहून मागासलेला आहे, या विषयावर विद्वत्ताप्रचुर प्रबन्ध लिहिला आहे व त्याला डाक्टरेट ही पदवी मिळणार आहे. प्रबंधात एक विधान असं आहे की मनुष्य पुरुषाला पुरुष व स्त्रीला स्त्री म्हणून दोघांमधला भेद भाषेतहि कायम ठेवतात. आम्ही पुरुषालाहि मुंगळा म्हणतो व स्त्रीलाहि मुंगळा म्हणतो. नरमादी भेद निसर्गात असेल. आम्हा मुंगळ्यांच्या भाषेला मान्य नाही, म्हणून आम्ही श्रेष्ठ, विकास आमचा जास्त झालेला.

तो फळाभोवतालचं एका हाताचं जग बघत होता. बघता बघता तो आपल्याच कानाला ऐकू जाईल एवढ्या मोठ्यानं म्हणाला, "विश्ववृक्षापासून हेहि जग असच कुजून सडून तुटून पडलं असेल. त्यांचच जीवसृष्टी निर्माण होऊन जगली, वाढली असेल. फळाला पडलेल्या भेगांमधून बाहेर येऊन त्यांनी मुंगळ्यां-प्रमाणे आपला संसार आरंभला असेल."

"माणसांशी आम्हा मुंगळ्यांची तुलना करतोस ?" एक मुंगळा त्याच्या पायाला कडकडून चावला. "खरं आहे, जग हे सडकं फळ झाडावरून खास गळून पडून जन्मलं असलं पाहिजे." तो आपल्याशीच उद्गारला.

आणि पुन्हा तो झाडावरच्या फळांकडे बघू लागला. प्रत्येक फळावर त्याला काळा डाग दिसू लागला, प्रत्येक डागावर तो मुंगळ्यांचे पुंजके बघू लागला.

"असंच माणसांचं जग कां !
कुजकं, नासकं, माणसांच्या पुंजक्यांनी भरलेलं."

प्रकाशित–ग्रंथ

महारेवाशीण	(लघुनिबंध संग्रह)	के. भि. ढवळे	१९५४
जन्म	(लघुकथा)	महतकर	१९५८
पूर्वस्मृति	(,,)	सुविचार प्रकाशन	१९६२
गाभारा	(लघुनिबंध संग्रह)	व्हिनस प्रकाशन	१९६३

अनुक्रमणिका

२. लघुनिबंध

पुण्याला मी गेलो की दोन ठिकाणांचं दर्शन घ्यायला मी सहसा विसरत नाही. थोरांच्या स्मृतीशी संबद्ध झालेली इतर स्थळं तर मी बघतोच. शनवार-वाडा, पर्वती, गायकवाडवाडा, आनंदाश्रम, न्यू इंग्लिश हायस्कूलची जुनी इमारत, ही आणि यांच्यासारखीच इतर स्थळं पाहिल्याशिवाय पुण्याच्या फेरीचं सार्थक झाल्यासारखं मला वाटत नाही. त्यांच्याचमध्ये आणखी दोन स्थळं आहेत. गणेशखिंडीजवळ रँडचा खून झाला त्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला एक लहानसाच रोवलेला प्रस्तर आहे. एखादा मैलाचा दगड असावा असंच तो अंतरावरून पाहिला असता वाटतं. पण जरा जवळ जाऊन तुम्ही त्यावरील अक्षरं वाचली की भारतीय इतिहासातील एका रोमांचकारी रात्रीचा देखावा डोळ्यासमोर उभा राहतो. रँडच्या मृत्यूचा प्रसंग ! इंग्रजी साम्राज्यवादाचा, अत्याचाराचा काळ आता संपला. त्यानंतर आता अत्याचार निष्क्रिय वृत्तीने सहन केला जाणार नाही. अत्याचाराला उत्तर दिल्याशिवाय भारत राहणार नाही. खणखणीतपणे बजावणारी पहिली गोळी या ठिकाणी निनादली. आणि रँड यमसदनाला गेला. इंग्रजी साम्राज्यवादाचा पहिल्यांदा थरकाप उडाला. हे सगळं ज्या ठिकाणी घडून आलं त्या ठिकाणी इंग्रज सरकारने एक प्रस्तर बसवला होता. आज या प्रस्तराची स्थिती काय आहे मला माहीत नाही. मी तो पाहिल्याला आज जवळ जवळ पंधरा वर्षांचा काळ लोटला आहे.

फर्ग्युसन कॉलेजच्या मागे टेकडी आहे, या टेकडीवर एक स्मृतिप्रस्तर आहे. त्या स्मृतिप्रस्तरावर शब्द कोणते आहेत हे मला निश्चित आठवत नाही. पण तो कशाकरिता उभारण्यात आला याची मला आठवण आहे. हरिभाऊ आपटे आणि गोपाळ कृष्ण गोखले यांनी ज्या ठिकाणी आपल्याला आयुष्यात काय करावसं वाटतं याविषयी जिथं ते दोघंही थोर महाभाग एकमेकांजवळ बोलले त्या स्थानी हा प्रस्तर आहे. दोन थोरांच्या मनोमन आशाआकांक्षांच्या उच्चारांची ती पुण्यभूमी आहे. पुढच्या आयुष्यात दोघांनीही आपली वाणी खरी केली. गोखल्यांनी समाजसेवा राजकारणानं साधली. आपटयांनी लेखणीनं. ज्या भूमीनं आकांक्षा ऐकल्या होत्या तिनं त्यांच्या जीवनसाधनेतील कृतकृत्यता समावून घेतली. तो स्मृतिप्रस्तर आपटे आणि गोखले यांच्या सकल कार्याचं पार्थिव रूप आहे. आपटे, गोखले आणि भारतातील, जगातील थोर थोर पुरुषांच्याविषयी माझ्या अंतःकरणात निष्ठा आहे, आदर आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनाशी संबंध असलेल्या स्मृतिवस्तूही मला आदरणीय आहेत. परंतु हा प्रस्तर प्रथमच मी पाहिला तेव्हा त्यावर कितीतरी वांडगुळं चढून बसली होती. त्या वांडगुळांपैकी

कुणाचं नाव सिंधू होतं, कुणाचं नाव विंदू होतं, कुणाचं नाव माधव होतं, कुणाचं नारायण होतं. आणखी कितीतरी सिंधू, इंदू, माधव, नारायण मंडळी त्या स्मृति-प्रस्तरावर कावळ्याप्रमाणे, पण कायमची येऊन बसली होती. त्या स्मृतिप्रस्तराला आलेल्या ह्या देवदेवींमुळे त्या प्रस्तराचं कार्य, त्या प्रस्तराचा लेख प्रयासानंच कळे. या स्मृतिप्रस्तराच्या भोवताली जर सिंधू, इंदू, माधव, नारायण मंडळीने आपापल्या नावाचे प्रस्तर उभारले असते तर दुरून पाहाणाऱ्याला एखाद्या किरिस्ताव स्मशानभूमीचं दर्शन घेण्याचं तरी पुण्य लाभलं असतं. परंतु नाही, ह्या बांडगूळ मंडळीला गोखले आपटे यांच्या प्रस्तरावरच स्वतःची शोभा करून घ्यायची होती. अॅटिला या नावाचा एक हूण राजा होऊन गेला. पराक्रमी होता, नेता होता. जुलमी होता. रोमन राजांच्या सर्वाधिकाऱ्यांच्या भिंतीवर ज्या प्रतिमा आलेखित केलेल्या असत त्याच्यावरच तो स्वतःची प्रतिमा रंगवायला सांग. ह्या सिंधु, विंदु, माधव, नारायण म्हणजे आजच्या अॅटिली आणि अटिले म्हटलं तर त्यांत वावगं काय आहे. स्वतःचं नांव अमर व्हावं, लोकांच्या नजरेला सतत पडत रहावं म्हणून आपटे गोखले यांच्या नावाची स्मृतिप्रस्तरावर, त्या प्रस्तरावरील लेखांचा आपण नाश करतो आहोत ह्या गोष्टींची जाणीव न घेता त्यांनी नावं कोरिली. मी जर त्यांना अॅटिलाच्या मालिकेत गोविले तर त्यांना खास सुखाचेच वाटल.

आणि तिसरा दगड ताजमहाल. ताजमहाल मनोरम वस्तु असली, त्याला भव्यता असली, डौल असला, शिल्पाकृती या नात्यानं त्याच्या ठिकाणी अप्रतिमता असली, कवीच्या शब्दांत तो कालकपोलावरील अश्रू असला, आकाशाच्या निळ्या कोंदणात बसवलेलं ते एक अतीव रम्य दर्शन असलं, तरी अंती तो दगडच. चालताबोलता, इंद्रियांनी रस घेणारा, ज्ञानाचं क्षेत्र क्षणाक्षणाला विकसित करणारा, कलाकृतींनी जग शोभिवंत करणारा, जीवनाला अर्थ आणणारा, त्रिविक्रम वामना-सारखा प्रतापी माणूस पण शेवटी तो देखील मातीच. मनुष्य उभा आहे तोवर माणूस. आडवा झाला की माती. ताजमहाल उभा आहे तोवर ताजमहाल, पण कोसळला तर दगडांचा खच. दगड, त्याचं मोल दगडानंच. दगड मर्मरी, तेव्हा दोनचार पैसे जास्त.

लॉर्ड विलियम बेंटिकच्या कारकीर्दीतला प्रसंग. साल मला माहित नाही. कंपनीच्या तिजोरीत तूट येण्याचं कारणहि माहित नाही. पण कंपनीला खर्चायला पैसा कमी पडला होता. बेंटिकच्या अधिकाऱ्यांनी पैसा उभा करण्याचे निरनिराळे मार्ग शोधून काढले असावे. त्यांच्यावर विचार केला असावा. परंतु यांतून मार्ग काढण्यात आला तो विचित्रच. आज तुम्हा आम्हाला विचित्र वाटेल. पण बेंटिकला मात्र तसा तो विचित्र वाटला नाही. ताजमहालची इमारत एकसंघ विकत घेण्याची

तर कुबेराशिवाय इतर कोणाचीहि हिंमत नाही. पैसा तर मर्त्य लोकांकडून उभा करायचा. मग काय करायचं ! ताजमहालाचा चिरा अलगअलग करून तो विकायला काढायचा. हा प्रयोग करण्याच्या अगोदर कंपनीसरकारनं आग्र्याच्या किल्ल्यातील एक हमामखाना काढून तो इंग्लंडला पाठवला होता. परंतु भाव त्याला आला नाही. आणि म्हणूनच अपेक्षित ताजमहालाबाबत खडा तेवढा ताजमहालच. अशी भाषा, कवीला वापरता आली आणि मूषा जो या जगताची, असून त्याचा गौरव करता आला.

दिल्लीच्या आसपास, सगळ्या भारतभर वास्तुशिल्प सर्वदूर पसरली आहेत. काही देवळांचे चिरे काढून घराच्या पायऱ्यांना लावले आहेत. काही देवळांतून, देव पळून गेल्यामुळे माणसं निवासाला आहेत. दिल्लीच्या भोवतालच्या प्रस्तर वास्तूमधून माणसाच्या वसाहती निर्माण झाल्या असल्या आणि कलांतरानं या वास्तूंच्या मुखावर अवकळा, काळोखी आली असती. वेंटिक आणि आम्ही या दोघां-मध्ये काळाची खाई निर्माण झालेली असली तर विचारसरणीत भेद नाही.

रात्रीच्या निवांत वेळेला, चांदण्यात हे माझे तीन प्रस्तर एकत्र आले, आणि परस्परांशी बोलू लागले, तर ! कल्पनाच करा.

१ जुलै १९५७

विचार आला तो हा की लोकमान्यांच्या मंडाले येथील निवासावर एक स्वतंत्र, संपूर्ण ग्रंथ का निर्माण होऊ नये? लोकमान्यांनी आपल्या मंडाले येथील निवासात गीतारहस्याची रचना करून आपला तेथील निवास चिर-स्मरणीय केला. परंतु या ग्रंथामागचे परिश्रम, त्या ग्रंथाचा विकास, त्याची परिपूर्णता, दैनंदिन जीवन, प्रज्ञावंत मन या सगळ्यांना मंडाले येथील जीवनावरील ग्रंथ तयार करून अधिक सुपरिचित संस्मरणीय का करू नये ? १९५६ मध्ये लोकमान्यांचा १०० वा जन्मदिन साजरा करण्याचा अखिल भारतात सोहळा होईल. त्या प्रसंगी लोकमान्यांची स्मृती अशा एखाद्या ग्रंथाने जागवली तर ते खास उचित होईल.

गो. रा. दोडके

३. एक वस्तुनिष्ठ दर्शन : तपस्वी

सत्याग्रहाचा दंड सरकारात न भरल्यामुळे—घरावर कुडकी आली. घरातील सगळ्या मोलवान वस्तू निघून गेल्या. गणित, ज्योतिष्य, क्षारौषधे यांचीहि पुस्तके त्याचबरोबर गेली.

सगळं सामान गाडीत भरलं गेलं व गाडी चालू झाली.

जड अंतःकरणानं एक म्हातारा तिच्यामागून चालू लागला. तो कुणाशी बोलला नाही, कुणाकडेहि त्यानं पाहिलं नाही. जमिनीकडे लागलेली त्याची नजर वर झाली नाही. बाहेरचं जग जणू त्याच्या दृष्टीपुरतं नाहीसं झालं होतं आणि त्याची दृष्टी हृदयातील जग न्याहाळीत होती.

गाडी कोतवालीजवळ आली.

दार ओलांडून गेली.

म्हातारा दाराजवळील पुलाजवळ थांबला. नंतर त्यानं पुलावरील धूळ उपरण्यानं झाडली व पुलावर तो बसून राहिला. दुपारच्या उन्हात तास दीड तास त्याने तेथेच काढला. मग एक दीर्घ उसासा टाकला व घराचा मार्ग सुधारला.

सायंकाळी भाऊजीकडे अनेक माणसं सांत्वनाकरिता आली. ते कुणाशीच काही बोलले नाही. माणसं येत, बसत, बोलत व निघून जात. मीहि त्यांच्याकडे गेलो. त्यावेळी त्यांच्याभोवती कुणीच नव्हतं. एकटेच उपरण्यानं वारा घेत बसले होते. मुद्रा खिन्नच होती. मी जाऊन त्यांच्याजवळ बसताच त्यांनी एकवार माझ्याकडे पाहिलं आणि ते पुन्हा आपल्या मनात निघून गेले. मी आल्याची त्यांनी नोणीवही घेतली नाही. मला शांत राहणं असह्य झालं, मी भाऊजीकडे बघत म्हटलं,

"सामान परत मिळण्याकरता तुम्ही सरकारात अर्ज का नाही करीत ?"

"अं !" एखाद्या निस्तब्ध, निर्जीवन गुहेतून नाद यावा त्याप्रमाणे त्यांचा उद्गार ऐकू आला. थोडा वेळ पुन्हा ते शान्त राहिले. आणि मग विषादमय आत्मव्यंजक स्वरात म्हणाले, "इतकं आयुष्य गेलं, म्हातारवय झालं, घाटावर गोवऱ्या गेल्या, सत्यस्वरूपाचा इतका अभ्यास केला...पण माया याहूनहि मोठी आहे. आज पुस्तकांकरिताच जीव अडकून पडला. कुत्र्यासारखा गाडीमागून गेलो आणि निराशेनं मनातल्यामनात रडत घरी परत आलो."

हे शब्द व ते बोलत असतानाची भाऊजींची मूर्ती, आज, काल बराच लोटूनहि जशीच्या तशी माझ्या डोळ्यांसमोर आहे. भाऊजींना कोणतं दुःख असेल,

अनुक्रमणिका

याविषयी माझ्या मनानं केलेली अटकळ आणि त्यांच्या दुःखाचं त्यांनी बोलून दाखविलेलं कारण, या दोन गोष्टींविषयी आजही मी विचार करतो. नुसता विचारहि मनात आला की, मला गंमत वाटते ती या कारणाने की, माणसा-माणसांच्या वृत्ती किती भिन्न! भाऊजी दुःखी असतील ही मी कल्पना केली, त्यांच्या लिलावाला गेलेल्या पुस्तकांवरून भाऊजींच्या मुखातून आत्मनिर्भर्त्सना बाहेर पडली, यालाहि कारण ती पुस्तकंच. कारणं तीच, विचारांचं आरंभस्थान तेच. पण मी कुणीकडे गेलो होतो! ते कुणीकडे गेले होते!

भाऊजी गरीब आहेत, भिकारी आहेत, दरिद्री आहेत. त्यांच्या घरी पैसा दिसायचा पण तो योगक्षेम चालविण्यापुरताच. तोहि मिळाला नसता. पण त्यांच्या लाजेची चाड सरस्वतीला होती, त्यांना ओळखणारांना होती, म्हणून चुलीला अक्षता वाहण्याची पाळी त्यांच्यावर यायची नाही. पण अशा या जीवनात चैन कुठली! व्यसन कुठलं! मनरंजन कशाचं! तरीहि या रखरखीत जीवनात काही पाणथळी होत्या. दोनच. धानाच्या लाह्या, आणि घरची मुलं. भाऊजी आनंदात असले की, लाह्याची थाली त्यांच्यासमोर ठेवून द्यावी, असे मिटक्या मारीत खातील की, जणू पुरणपोळी व वड्याचं जेवण. तसंच मुलं भोवती खेळत असली, भाऊजींना त्यांनी घेऊन घेतलं, भाऊजींच्या म्हातारपणाला त्यांनी 'बनवलं' की झालं, संपलं. मुलींनी घर डोक्यावर घ्यावं, धिंगाणा घालावा. भाऊजींवर राज्य आणावं, खूब वेळ पदवावं, ते थकले व त्यांनी तसं म्हटलं की 'रडीरडी' म्हणून चिडवावं.

आरडाओरड चाललेली असली की, मुलींना रागवायला घरातली माणसं येतात. भाऊजींना मुलांशी खेळतांना बघतात. 'का बाप्पा!' म्हणतात, व आल्यापावलीच परतून जातात, अशावेळी व्यक्ति म्हणजे त्यांची सहधर्म-चारिणी, "लहानपण आलयं तुम्हाला. हुंदडाल, खेळाल आणि रात्री पाय दुखले म्हणजे मला जागवाल", हा मंत्र एकदा म्हटला, मुलांना पळवून लावलं की, मग म्हातारी ओशाळल्या वृत्तीनं भाऊजींसमोरून निघून जाते आणि नंतर भाऊजी आपल्या बायकोकडे ज्या नजरेनं पाहतात, तीत अमृत भरलेलं असतं.

भाऊजींची यावेळची मूर्ति! इतकं सौंदर्य मला आजवर कुठंच आढळून आलं नाही.

मी वर म्हटलं भाऊजींना कोणतेच व्यसन नाही. चुकलं माझं. त्यांना विडी-तंबाखूचं, पान-सुपारीचं नाही, पण ज्ञानाचं आहे. त्यांची ज्ञानलालसा उत्तुंग हिमालयाहून उंच आणि अनंत आकाशापेक्षाहि विशाल आहे. ज्योतिष, गणित, वैद्यक, धर्म, वेद, समाजशास्त्र आणि तत्संबंधी शास्त्रे त्यांनी आत्मसात केली आहेत, आणि आजहि, शरीर थकलेले असताना त्यांची बुद्धी इतकी चौकस आहे की, अभ्यासाच्या विषयावर नवीन ग्रंथ आढळला की तो मिळवून वाचून, मनन

करून त्यावर विवेचना लिहून आपल्याजवळ ठेवल्याशिवाय भाऊजींना विसावा नाही, समाधान नाही. अशाच वेळी अधीरता, विमनस्कता, लालसा प्रकट होते. इतर वेळी मात्र आकाशींची अविचल शांती.

त्याचप्रमाणे त्यांच्या सुखदु:खांचे दर्शन घडविणारी दुसरी गोष्ट म्हणजे त्यांची पुस्तके.

भाऊजी गाडी मागोमाग गेले आणि निराश अं:करणाने परत आले ही घटना कुणाला उपमर्दकारक वाटली तर वाटो, पण भाऊजींच्या निकटवर्ती परिवाराला मात्र ती एक करुण घटना वाटते.

लक्ष्मीची भाऊजींवर किती कृपा आहे याविषयी आधीच मी सांगितलं आहे. अशाहि परिस्थितींत त्यांनी अत्यंत मोलवान ग्रंथसंग्रह जमविला. एकेक ग्रंथाच्या मागे अव्हेरिलेली भूक, काळजाचं पाणी, जळालेलं रक्त आहे. निष्कांचनाची ज्ञानसेवा म्हणजे एक दिव्य. ज्ञानाची तळमळ ग्रंथांनी शमन व्हायची. ग्रंथांना मोल जास्त. आइनस्टाइनच्या सिद्धांतावर मी एक अठरा पानांचं पुस्तक पाहिलं. गंमत म्हणून किमत विचारली, "वीस रुपये" ऐकताच तोंडाचा चंबू केला. असल्या पुस्तकांचा भाऊजींना हव्यास. जिवाचा आटापिटा करून त्यांनी हाहि हव्यास पूर्ण करून घेतला. फ्रेंच, जर्मन, इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा संग्रह केला. हा संग्रह गाडीतून लिलावाला निघाला होता. दुसरा मनुष्य जीव टाकायचा. पण भाऊजी म्हणत होते, "कुत्र्यासारखा गाडीमागून गेलो. उभ्या हयातीनंतरहि उपाधी सुटल्या नाहीत."

भाऊजींचा आपल्याच मनाशी चाललेला हा संघर्ष अत्यंत मनोवेधक आहे. वासनालिप्त अचिरंतन मन आणि निर्विकार, अविनाशी आत्मा या दोघांचा संग्राम भाऊजींच्या अंत:करणात नेहमी चाललेला असतो. रोजच्या आयुष्यात लहान-लहानशा प्रसंगामध्ये ते युद्ध बघणं मनाला भारी उद्बोधक वाटतं. बुद्ध भगवान आणि मार यांच्यामधील स्पर्धा जितकी चित्तवेधक, तितकीच भाऊजींच्या अंत:करणातीलहि.

भाऊजी वैद्यक चांगलं जाणतात. त्यांच्या बाराक्षारपद्धतीनं अनेकांना गुण आला आहे. इतर डॉक्टरांनी असाध्य म्हणून टाकून दिलेले रुग्णाईत भाऊजींनी आपल्या हाताशी धरले, त्यांना रोगमुक्त केलं, नवजीवन दिलं. भाऊजींच्या हातचा गुण ज्यांना कळला, त्यांना प्रत्यय आला, त्यांतील काही तरुण मुलं त्यांच्या भोवती गोळा झाली व वैद्यकाचा अभ्यास भाऊजींच्या डोळ्याखाली करू लागली. एक दिवस भाऊजी आपला वर्ग घेत होते. जवळच नातवंडं खेळत होतो. एक लहान मूल गाठीचं पदक खातखात वर्गात आलं. इतर मुलांनी त्याला पदक मागितलं, त्यानं देण्याचं नाकारलं. नंतर भाऊजींनी मागितलं. आजोबांना त्याने सपशेल धुडकावून लावलं. भाऊजींची मुद्रा एकाएकी विचारमग्न झाली.

भोवतालच्या मुलांना ते विसरले, आणि आपल्याशीच म्हणाले, "खरोखर माणसांना इतरांनाहि सुखी करावसं वाटत नाही. काय झालं असतं ? मला पदक दिलं असतं तर ! दुसऱ्याच्या सुखानं आपण सुखी होणं नाही जमत मुलांना." नंतर थोडा वेळ ते स्तब्ध राहिले. मग एक हुंकार दिला, म्हणाले, "आम्हा मोठ्या माणसांना हे कळत नाही, मग ती तर मुलंच." नंतर भाऊजींच्या मुखावरील विषाद निवळू लागला, आणि थोड्या वेळाने प्रसन्न ज्ञानप्रभा मुखावर झळकू लागली.

भाऊजींनी खूप अभ्यास करून, आपलं ज्ञान व्यवहाराच्या कसोटीवर पारखून काही जीवनसिद्धांत बसविले आहेत, आणि या सिद्धांताला बाध आणणारं काहीहि आढळून आलं की, आपलं प्रामाणिक मत सांगायला मागंपुढं पहात नाहीत. ज्योतिष गणित न जुळेनासं झालं की आकाशस्थ ग्रहांच्या स्थितीचं जितकं भावशून्य निदान करील. तितकीच भावनाशून्य वृत्ती भाऊजींची असते. एखादा रोगी त्यांच्याकडे गेला तर ते सरळ म्हणतील "मी औषध देतो. पण तुला असं असं रहावं लागेल. असं राहणं तुला अशक्य असेल तर रोग असाध्य." एका सद्‌गृहस्थाला मी त्यांच्याकडे दाखवायला नेलं. भाऊजींनी त्याला तपासलं, रोग पाहिला, सांगितला, म्हणाले, "डॉक्टर नाही, आयुर्वेद नाही, काही एक बरं करू शकत नाही. डॉक्टर इन्जेक्शन देईल, रोग तात्पुरता दबून राहील; आयुर्वेद तर अपरीणतत्त्व. वाराक्षार मात्र धन्वंतरी आहे." काही दिवसांनी मी भाऊजींना कळविलं, तो गृहस्थ आयुर्वेदिक उपाय करून बघतो आहे. भाऊजी उद्‌गारले, "नको बापडा, पण तो जगायचा नाही. रोग दाबल्यानं शरीरातून निघतो काय ? शरीर रोगाहून कणखर केलं पाहिजे. तुमचा डॉक्टरहि करत नाही नि आयुर्वेदहि करत नाही. जाणार तो."

भारतीय तत्त्वज्ञानाचा परिपाक, साकार स्वरूपात कुठं आढळेल का म्हणून जर कुणी मला म्हटलं तर मी भाऊजींकडे बोट दाखवीन, भारतीय तत्त्वज्ञानात जीवनाधार मानला गेलेला त्याग, निष्काम कर्मवृत्ति, निवृत्तिमधून प्रवृत्तिपर तत्त्वज्ञान निर्माण करण्याची रीति, मनन, चिंतन, संकलन, लेखन यांच्याकरिता स्वीकारलेली अभ्यासूवृत्ति, संपत्तिविषयी तुच्छता, या सगळ्यांमुळे भाऊजी पौराणिक इतिहासातील महर्षि वाटतात. त्यांना धन, विद्या, बल, आत्मबल, दानविद्येची अनास्था, प्रतिग्रहणाविषयी आदरवेद; पूर्वाचार्य, बुद्धि व तपस्व्यांविषयी, आस्था ज्ञानाविषयी आणि प्रेम शिष्याविषयी.

कित्येकदा मनात असा विचार येतो की पुराणात अश्वत्थामा हनुमानादि आत्मे चिरंजीव मानले गेले आहेत. अशाच एखाद्या चिरंजीवी तपस्वी आत्म्यानं भाऊजींच्या रूपानं देहधारणा तर केली नसेल ना !

---

४. पुस्तक परीक्षण : कोल्हटकरांचे " आत्मचरित्र "

जिने महाराष्ट्रशारदेची सेवा अव्याहतपणे दोनअडीच तपे केली, अनेक मनोवृत्ती कलात्मकतेने साकार केल्या, महाराष्ट्राला आपल्या संदेहपणी रंजविले, हसविले व पुढेहि बराच काळपावेतो समाधान व कौतुकाचा विषय होईल, ती कोल्हटकरांची लेखणी आपले पार्थिव स्वरूपातील अवतारकार्य संपवून आता विराम घेत आहे.

परंतु विराम घ्यायच्या अगोदर तिने स्वतःचाच जीवनेतिहास सरस्वतीच्या चरणी अर्पण केला आहे.

* * *

महाराष्ट्र वाङ्मयात आत्मचरित्रे मुळीच नाहीत असे नाही. समाजसेवक कर्वे, देवधर, पावगी वगैरेंनी आपली आत्मचरित्रे लिहिली आहेत. परंतु ती लिहिताना त्यांचा उद्देश वाङ्मयसेवेचा होता असे कुणालाहि म्हणता येणार नाही. ही आत्मचरित्रे वाचीत असताना त्या थोर समाजसेवकांचे मधूनमधून दर्शन होते. परंतु बहुधा असेच वाटत राहाते की, आपण एखाद्या संस्थेचा विस्तृत अहवाल वाचीत आहोत. समाजसेवकाच्या आयुष्यात त्याला ज्या महत्त्वाच्या गोष्टी वाटतात त्या स्वतःविषयीच्या नव्हत तर त्याने केलेल्या सामाजिक कार्याविषयीच्या. तो आपले कार्य प्रामुख्याने जगासमोर मांडतो व आपले व्यक्तित्व लपवून ठेवतो.

परंतु साहित्यिक जीवनाची गोष्ट निराळी. म्हणून साहित्यसेवकाच्या आत्मचरित्रात प्रामुख्याने त्याच्या जीवनाचा विकासच आढळून यावयाचा. आणि त्याने निर्माण केलेले साहित्य तरी काय असते ! तर आंतरिक जीवनाचे अथवा बहिर्जीवनाचे दृश्य स्वरूप. जीवनाचा व जीवनकार्याचा साहित्यसंसारात इतका निकटचा संबंध असतो. आणि म्हणूनच एखाद्या साहित्यसेवकाचे जीवन वाचीत असताना वाटते की आपण त्याच्या कलाकृतीतील प्रकरणे तर वाचीत नाही ना ! गॉटेचे " तरुण वेर्टरची दुःखे " किंवा " विल्टेन मेस्टरचा प्रवास " किंवा " फौस्ट " वाचा. तुम्हाला वाटते की, आपण " काव्य आणि सत्य " या त्याच्या आत्मचरित्रातील काही भागच वाचीत आहोत.

परंतु जितकी आत्मनिष्ठ गॉटेची लेखणी होती तितकी कोल्हटकरांची नव्हती. आणि अर्थातच गॉटे जितका ठळकपणाने आपल्याला त्याच्या लिखाणात आढळून येतो, तितके कोल्हटकर त्यांच्या लिखाणात दिसून येत नाहीत. असा

प्रकार असल्यामुळे कोल्हटकर व्यक्ती या नात्याने प्रथम आपल्या नजरेला येतात ते त्यांच्या आत्मचरित्रातच.

आत्मचरित्र साऱ्या दीडशे पानांमध्येच आटोपले आहे. आणि त्यात जवळ जवळ चाळीस पंचेचाळीस वर्षांचा वृत्तांत आला आहे. अशा रीतीने जर आपण पाहिले तर वर्षामागे चार पाने देखील नाहीत. कुणाला वाटेल की, कोल्हटकरांनी आपल्या आत्मचरित्रात काहीच लिहिलेले नसावे. रानावनातून जात असताना आपण आजूबाजूची झाडेझुडुपे किंवा लहान लहान नहर मोठ्या कुतूहलाने बघतो. परंतु उंच शिखरावर उभे रहावे आणि नंतर सभोवार नजर टाकावी. लहान लहान झाडेझुडुपे आणि इतस्ततः फिरणारे नहर नजरेला येत देखील नाहीत. केवळ उंच उंच व ठळक वृक्ष आणि एखादी वहिनीच काय ती नजरेला येते. आत्मचरित्र लिहिताना कोल्हटकरांची भूमिका किंवा जीवननंदनवनाकडे पाहण्याची दृष्टी अशाच प्रकारची आहे. त्यांना आयुष्याची सगळीच वर्षे किंवा त्यातील सगळेच प्रसंग महत्वाचे वाटत नाहीत. विहंगमावलोकन करताना जेवढ्या गोष्टी उठून दिसल्या तेवढ्यांचाच आत्मचरित्रांत समावेश झाला आहे. गॉटे किंवा रूसो यांनी आपल्या आत्मचरित्राची रचना सालवार केली आहे. परंतु कोल्हटकरांनी तो मार्ग अवलंबिला नाही.

* * *

कोल्हटकरांचा जन्म २९–६–१८७१ रोजी झाला. त्यांची सख्खी आई त्यांच्या सहाव्या वर्षीच निवर्तली. नंतर पित्याने पुन्हा लग्न केले. सावत्रमातेने त्यांना अगदी पोटच्या पोराप्रमाणे वागविले. वयाच्या नवव्या वर्षी त्यांच्या तोंडाला अर्धांगवायूचा विकार झाला. शिवराम नावाच्या एका विद्यार्थ्याशी स्पर्धा कर-करण्याची बुद्धी वरल्यामुळे वाचनाच्या व्यासंगाला आणखी चालना मिळायला कारण त्यांचे बेडौल शरीर झाले. मुले त्यांच्या शरीराचा उपहास करीत. अर्थातच इतरांशी मिळून मिसळून वागण्याची वृत्ती कमी झाली व एकांतात पुस्तके वाचून वेळ काढावासा वाटू लागला. "आपली गती जरी बेडौल असली तरी लेखनात प्राविण्य मिळवून ते व्यंग झाकून टाकता येईल असे वाटू लागले." याच सुमारास त्यांनी अकोल्याच्या तहसिलदारावर मोरोपंती आर्येच्या धर्तीवर समयक आर्या रचिली. हीच त्यांची पहिली कविता. मराठी पाचव्या इयत्तेत असतांना किर्लो-स्करांच्या शाकुंतलाची कीर्ति त्यांच्या कानी आली व त्यांनाहि नाटक लिहावे से वाटू लागले. एका नाटकाचे त्यांनी बरेच प्रवेश लिहिले. फारशा चाली माहित नसल्यामुळे दिंड्या, साक्या व कटाव यांचीच त्यात भरती होती. साऱ्या ऋतूतील एकूण एक फळझाडांचा व फुलझाडांचा नामनिर्देश केलेला असा एक बगिच्याच्या

वर्णनाचा कटाव होता. सातव्या इयत्तेत असताना त्यांनी एक "सुखमालिका" नावाचे नाटक लिहिले. किर्लोस्कर मंडळी अकोल्यास असताना अण्णा किर्लोस्करांना आपले नाटक दाखवावे अशी इच्छा होऊन त्यांनी मंडळीच्या बिऱ्हाडाजवळून कितीतरी वेळा फेऱ्या घातल्या, "परंतु अंगी धीटपणा नसल्यामुळे अण्णांशी बोलण्याचे मुळीच धाडस झाले नाही."

कोल्हटकरांच्या लेखनाची सुरुवात अशी आहे. लहानपणी एकटे एकटे रहावे व वाचनामधून लेखनस्फूर्ती मिळावी. अनुकरण आणि ईर्षा या दोघांनी स्फूर्तीचे जतन करावे. अशा प्रकारे सुरुवात झालेल्या साहित्यसरितेचा विकास कुणाला सांगायला का हवा ?

* * *

आत्मवृत्तात कोल्हटकरांच्या जीवनाविषयी किंवा त्यांच्या विचाराविषयी माहिती मिळतेच. परंतु आणखी एका गोष्टीविषयी अत्यंत उद्बोधक मजकूर आढळून; येतो तो म्हणजे साहित्यिक जीवनाविषयी.

लेखनाकडे मनाचा कल का झुकला ? माणसांची लेखकाकडे पाहण्याची वृत्ती, लिहिलेला पहिला लेख हव्या त्याच मासिकात प्रसिद्ध होणे. नाटकाची कल्पना सुचते कशी, ते लिहिले जाते कसे, पदांच्या कल्पना कशा येतात; नाटकाचा पहिला प्रयोग, हृदयांती आंदोलने, उपहास, स्तुतिनिंदा; एखाद्या थोर व्यक्तीने आपला उल्लेख केला असल्यास होणारा आनंद, वाटणारा आत्मविश्वास व कार्याला येणारा नवीन जोम; मिळणारे मित्र होणारे शत्रू—ह्या सगळ्यांविषयी आपल्याला आत्मवृत्तात माहिती मिळते. साहित्यिक जीवनाविषयी महाराष्ट्र-साहित्य आजवर तरी उदासीन राहिले आहे. महाराष्ट्र वाङ्मयाचा विकास मुळी आधीच आकुंचित व खुरटलेला. एखाद्याने स्वतःविषयी जेव्हा जेव्हा माहिती सांगण्याचा प्रयत्न केला तेव्हा निर्घृण उपहासाशिवाय वाचकांकडून त्याला काय मिळेल ? बरं, नंतर साहित्यिक अभिरुची आणि हसत खेळत टोले घ्यायचे ह्या वृत्तीचा अभावच. साहजिकच आत्मवृत्त किंवा तत्सम आत्मपर लिखाण महाराष्ट्राला अजूनहि पारखेच आहे. कोल्हटकरांनी आपल्या आत्मवृत्ताच्या योगाने साहित्यिक जीवनाची बरीवाईट बाजू वाचकवर्गासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे व तोहि अत्यंत यशस्वी, उद्बोधक व हृदयंगम रीतीने.

परंतु आत्मवृत्तात आढळून येणारी अभिनव व मोलवान माहिती म्हणजे त्यात वेळोवेळी प्रविष्ट झालेल्या महत्त्वाच्या व्यक्तींची. आजवर महाराष्ट्रात तरी अशाप्रकारचे लिखाण तयार झालेले नव्हते. महाराष्ट्रीय लेखकांची अब्रू जणू काय काचेची ! एखाद्याच्या शब्दाचा तिच्यावर आघात झाला तर तिला एकदम

चीर तरी पडते किंवा राई एवढी शकले तरी होतात. अशी स्थिती असल्यामुळे एखाद्या साहित्यिकाविरुद्ध काही मजकूर लिहिला गेला तर तो, त्याचे भाईबंद भक्तगण सगळे लेखावर तुटून पडतात. उखाळ्यापाखाळ्या निघतात व रणे माजतात. असा एकंदर प्रकार असल्यामुळे कुणी कुणाविषयी लिहिण्याचे-वर्तमानपत्री लेखाशिवाय धाडस करीत नाही. आत्मचरित्रात ज्या व्यक्तीविषयी माहिती आलेली आहे, त्यांतील काही हयात आहेत. गुर्जरांचे कोल्हटकरांजवळील छायाचित्र काही निर्मळ नाही. केळ्यांच्यासंबंधी वाचताना ओठांभोवती हास्याची एक चिमुकली दुमड पडते. हिराबाई पेडणेकर व गडकरी यांच्याविषयी वाचताना मन प्रसन्न होते. हिराबाईविषयीचा एकंदर भाग अद्‌भुतरम्यतेचाच व लिहिताना कोल्हटकर पुन्हा आपल्या स्मृतिकाळातच रहात असावेत असे वाटावे इतक्या रसाळ लेखणीने तो लिहिला गेला आहे. गडकऱ्यांसंबंधी लिहिताना जिव्हाळा जास्त दिसून येतो. गडकऱ्यांच्या मैत्रीचा सगळाच भाग हृदयस्पर्शी. प्रथमत. गडकरी कोल्हटकरांच्या द्वेष्टयांपैकी होते. परंतु कोल्हटकरांची नाटके स्वतंत्र आहेत. अशी खात्री झाल्यावर ते त्यांच्या नाटकाचे निस्सीम भक्त बनले. कोल्हटकरांनी दर्शनातुर गडकऱ्यांचे हृदयंगम चित्र रेखाटले आहे. "बार्शीला जाण्यापूर्वी पुण्यास असताना हे (गडकरी) माझी भेट घेण्याचा प्रयत्न करीत होते. मी संध्याकाळी बुधवारातील पंपूशेट नावाच्या गंध्याच्या दुकानी बसत असे. म्हणून ते मला पाहण्याला त्या दुकानापासून काही अंतरावर उभे राहात." नंतर ओळख होऊन जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. आयुष्यात खटके उडायचेच. त्याप्रमाणे कोल्हटकर व गडकरी यांच्यात ते उडले देखील. परंतु एकाला असलेली आपल्या मित्राच्या अंतःकरणाची जाणीव व दुसऱ्याच्या अंतःकरणात असलेली अकृत्रिम भक्ती यांच्यामुळे विलग झालेले प्रीतीचे धागे पुन्हा जुळणे कठीण नव्हते. गडकऱ्यांच्या शेवटच्या भेटीचा प्रसंग तर अत्यंत हृदयद्रावक आहे. तो वाचल्यानंतर कुणाचेही डोळे सजल व्हावेत.

दोस्त ! जरूर वाच बरं आत्मवृत्त. तू जर वाचले नाहीस तर त्यातील खुमारी नाही कळून यायची तुला. प्रथम ते वाच. आणि नंतर हे माझं खुटुमुटु.

प्र०—श्री. ह. वि. मोटे, गिरगावजार, मुंबई नं. २.

' विश्ववाणी 'मधून

अनुक्रमणिका

५. रोजनिशी

आज चंद्र सात कळांनी प्रकाशतो आहे. आकाशात मेघ आहेत. पण चंद्राचा मार्ग निर्वेध आहे. ते दूर उभे आहेत. एखादा लहानसा मेघ चंद्राला झाकोळून टाकतो, त्याची सुषमा मलूल करतो, त्याची दीप्ति क्षीण करतो, नंतर निघून जातो. पुन्हा चंद्र सात कळांनी प्रकाशू लागतो.

आज आषाढातली सप्तमी. काल मेघांनी पाऊस "घ्या घ्या" म्हणून पाडला. दोनतीन दिवसांपासून मेघ आकाशात जे तळ देऊन बसले आहेत ते अजून हलले नाहीत. सायंकाळी तर त्यांनी गाढा नीलश्यामल रंग धारण केला होता. मधून मधून तुषारही उडवले होते. जणू सुचवीत होते, "येतो येतो." पण पुन्हा आकाश निवळलं. चंद्र आपल्या तेजानं प्रकाशू लागला.

मी आपल्या खोलीत खुर्चीवर बसलो आहे, सिगारेट ओढतो आहे. चंद्रावर नजर रोखून बसलो आहे. चंद्र गुलमोहराच्या शाखापानांमधून चालला आहे; पानं वाऱ्याशी गुजगोष्टी करताहेत, हलताहेत, डुलताहेत.

वर्षाकाळी हे दृष्य बघायचं भाग्य क्वचितच लाभतं. कित्येकदा तर, शुक्लपक्ष असूनही चंद्रचांदण्यांची स्मृतीही होत नाही, इतकं काळोखानं आकाश माखलेले असते. पण ज्या वेळी आकाशात चंद्र प्रकाशत असतो ती वेळ पर्वणीसारखी, नेत्रोत्सवासारखी वाटते. मन आनंदमय होते, उत्फुल्ल होते. मनुष्याच्या मनात सागराचा काहीतरी अंश असला पाहिजे, नाही तर चंद्रदर्शनाने मन उचंबळून का येते ? बघा ना. चंद्राकडे बघता बघता माझं मन कुठंकुठं जाऊन आलं.

चंद्राच्या जवळच एक रेशमी सायलीच्या फुलासारखा नाजूक, दुग्धधवल मेघ आहे. चंद्रकिरणात तो न्हाऊन निघाल्यामुळे वेगळंच तेज, शोभा त्याला आली आहे. त्याच्याकडे बघता बघता मला टेरेसाची आठवण झाली. टेरेसा कोणत्या स्थळी मला भेटली होती हेही आज मी विसरून गेलो आहे. × × × बरोबर आपण गेलो नव्हतो अशी बतावणी करता यावी म्हणून ही योजना, बतावणी. कोवळ्या प्रीतीच्या खेळातला हा एक गोड लपंडाव. इतरांची फसवणूक आणि आपलीही.

निळ्या आकाशात चंद्राचा अंशगोल तळपतो आहे. बघता बघता आकाशाचा होतो समुद्र आणि चंद्रगोल जणू प्रतिबिंबच वाटतो. बाजूला मेघ आहेत. ते भरती ओसरून गेल्यानंतर उघड्या पडलेल्या किनाऱ्याप्रमाणे दिसतात. वेगळंच चित्र डोळ्यांना दिसू लागतं. ज्यूलिअस ऑलस्सनचे एक चित्र आहे. Moonlit Show. ते डोळ्यासमोर येते. मी किनाऱ्यावर उभा आहे. चंद्राचं प्रतिबिंब

क्षितिजापासून माझ्या पायापर्यंत सागराच्या पाण्यात दिसते आहे. प्रत्यक्ष चं चित्रकारानं आपल्या कलाकृतीत दाखवला नाही. पण सागराच्या जललहरींव आणि किनाऱ्यावर जी प्रसन्न चेतोहारी मायाविनी सुषमा नित्यनूतन सौंदर्य निर्मा करते तीच दाखविली आहे. अनेक चित्रकारांनी चंद्राची सुषमा चित्रात आलेखिल आहे. एकालाही तीत रंग भरता आले नाहीत. मी पाहिलेल्या चित्रांमध्ये Julius Olsson चं एवढं एकच चित्र अपवाद म्हणून वाटतं.

पुन्हा माझी दृष्टी आकाशाकडे वळते. चंद्र दिसेनासा झाला आहे. सर्वदूर जणू काय काळी झूल पडली आहे.

● ● ●

Books and Persons मधून Henri Becque वरील लेख वाचला. वेक हा १९ व्या शतकातील एक नामांकित नाटककार. वास्तववादी नाटककारांमध्ये तर त्याचे स्थान बरेच वरचे आहे. त्याची नाटके 'La Parisienne' आणि Les Corbears. पहिल्याचा दर्जा दुसऱ्यापेक्षा उच्च आहे. परंतु त्याच्या नाटकांच्या योग्यतेप्रमाणे त्याला प्रसिद्धी लाभली नाही. त्याच्या मृत्यूपर्यंत इंग्लंडमध्ये कुणाला माहितही नव्हता. तो वारल्यावर Les Potichinelles हे अपूर्ण नाटक आढळून आले. बेकचा गुमास्ता M. Robaglia याने ते Gith Blasचा संपादक M. Henri de Nousanne याला पूर्ण करायला दिले त्याने ते केलेही परंतु M. Robaglia ला ते आवडले नाही व त्याचे प्रयोग होऊ देण्याचे त्याने नाकारले. लौकरच युद्धाला तोंड लागले, शेवटी ते एका मासिकात (L' Illustration) मध्ये पुरवणीसकट प्रसिद्ध करण्याचे ठरले. नंतर Stock नावाचा एक प्रकाशक आडवा आला. त्याने आपल्याकडे प्रकाशनाचा हक्क आहे व इतर कुणी ढवळाढवळ करू नये अशी हरकत घेतली. परंतु L' Illustration श्रीमंत असल्यामुळे Stock ची पिरपिर चालू शकली नाही. नाटक प्रसिद्ध झाले व त्याची किंमत लोकांना कळून आली. भाषांतराचा तोकडेपणाही लोकांच्या प्रत्ययाला आला. बेनेट म्हणतो, " I can think of no living author who would be equal to the task of comspleting the play without making himself ridiculous." त्याचे जीवन, त्याचप्रमाणे मरणही अत्यंत दुर्दैवी होते. त्याच्या कबरीजवळ त्याच्या चाहत्यांनी एकमताने ठरविले की आपण Becque चा मृत्युदिन पाळावयाचा व त्याकरिता येथे जमावयाचे. His name shall be a flag for us बरीच वर्षे तर त्यांना बेकची आठवणच झाली नाही. आणि जेव्हा, काही वर्षांने ते पुष्पमाला

घऊन आले तेव्हा त्यांना त्याची कबरही सापडेना. अखेरीस त्यांनी रजिस्टर पाहून व रखवालदाराला विचारून कबरीची माहिती काढली. माला आर्पण केली गेली. भाषणे झाली. दुसऱ्या वर्षी मंडळी भाषणे व माळेसकट आली. परंतु त्यांच्या आधीच कुणी व्यक्ती आली होती. कबरीवर माला होती. तीवर लिहिले होते. "माझ्या प्रिय कैलासवासी पतीला". परंतु बेकने आयुष्यात लग्न केले नव्हते. बेकच्या चाहत्यांनी मागले वर्षी एका साधारण कारकुनाच्या कबरीवर माला वाहिली होती व लंबीचवडी भाषणे केली होती. ह्यानंतर परिसनगराने Becque चा एक पुतळा उभारला. परंतु तो केवळ अर्धपुतळाच होता. तो Avenue de Villiers मध्ये आहे.

बेकसंबंधी वाचीत असता मला गडकरी, राजसंन्यास व दत्तोपंत सुळचांची पुरवणी आठवली व मौज वाटली. किंचितसा खेदही झाला. ३०–७–३४

● ● ●

६. शेवटचे शेवटचे लिखाण : माझा पठाण

आज त्याचा "नकार" ऐकताच माझ्या लक्षात आलं की, पहिल्या तारखेला ऑफिसमधून बाहेर पडल्यावरोबर, कितीहि त्याला आग्रह केला तरी तो क्लबमध्ये खेळायला येत नाही. एरव्ही मला क्लबमध्ये खेळण्याकरिता ओढून नेणारा, पण आज त्याचा नूर काही वेगळाच असतो.

पहिली तारीख. लहानशा पगारानं, लहानसाच खिसा फुगलेला, परंतु तोच आज इतका जड वाटतो, इतका मोलाचा वाटतो की सगळं जग त्याच्या पासंगाला यायचं नाही. जग तरी काय ! तेही एवढंसच असतं. मित्रावरोबर एकदोन डोसे, एखादा चित्रपट किंवा क्लबमध्ये जाऊन रुपया–दीडरुपयाची वालमेल करणे. परंतु असं असलं तरी पहिली तारीख हे एक फार मोठं, मोठं मनोरम, सगळ्यांना समजणारं, पटणारं काव्य आहे.

आणि याच काव्याचा आस्वाद घ्यायला, क्लबमध्ये खेळायला चल म्हणून मी त्याला ऑफीसमधून बाहेर पडता पडता म्हटलं होतं.

आणि त्यानं नकार दिला होता.

माझी कल्पना झाली, त्याला जास्त पैसे खर्च करता येत नसावेत. घरगुती काही कारण असावं, म्हणून मी त्याला म्हटलं, "काही नाही. फक्त पाचसात आण्यातच खेळ आटपू. जास्त वेळ देखील बसणार नाही."

(पुढील मजकूर पान ४८७ वर)

७. नौखाली यात्रा

स्वप्नांतुन हो जागा राणा
घामाने डवडवला.
थरथर कापत होता, धीर न डोळे उघडायाला.

करालरूपी रणचंडीच्या मुखावरी रुधिराचे
पाट वाहती, अंगावरती डागहि चिरकांडचांचे
रक्तनयन, कररुधिरलिही, पदरक्तकमल तो पाही
स्वप्नभैरवी डोळचांपुढुनी क्षणहि हलली नाही.
जाग जरी ये तरिही वाटे असेल अजुन सभोती
मागायाला वीर रुधिर ती रक्तपिपासु मूर्ति.
स्वप्नांतिल तो नाद अजूनहि कानी त्याच्या घुमतो
"मैं प्यासी हूँ, मैं प्यासी हूँ" ठाव जिवाचा घेतो.

"आत्मज दिधले, दिले सहोदर, दिले वीर झुंजार
रक्तपिपासा शमली नाही काय अजुन तव घोर ?"
"मैं प्यासी हूं, मैं प्यासी हूं" हेच शब्द ती बोले,
ऐकताच त्याचिया जिवाचे पाणीपाणी झाले.
"उद्या तृषा मी भागवीन तव देउन माझे रुधिर"
रक्तप्राषिल्या मुखी उमटली चिमुकलि हास्य लकेर.
तोच जाहला जागा राणा घामाने डवडवला
थरथर कापत होता, धीर न डोळे उघडायाला

रणचंडीचे "मैं प्यासी हूं, मैं प्यासी हूं–बोल"
अंतरिक्षि घुमतात आजला, उत्तर कोण करील !
कोण कशाला ! एक महात्मा जो राष्ट्राचा प्राण
धगधगत्या ज्वालेत जाउनी वसे असे बलिदान
सर्वसंग सोडुन शांति सुख, एकलाच वनवासी.
करी साधना, देह कष्टवुन हृदये सांधायासी

अनुक्रमणिका

एक माय, लेकरे तियेचीं परस्परांवर उठली,
जोवर ती ना एक जाहली शांति महात्मा कुठली !
अहंकार, अज्ञान, अशुचिता सकल लयाला जावो
हीच एक जीवाची तळमळ, हाच जिवाचा लाहो.
पैशुन्य करो या भूवरती कुठे कुणावर वार
नीळा वळ उमटला याचिया हृदयावर हळुवार
जीवन अपुले मानवतेच्या वेदीवर उतरून
कधिच ठेविले, जीवन याचे एक दिवस बलिदान.
" मैं प्यासी हूं, मैं प्यासी हूं " नाद थांबवी अपुला
ह्या धर्माचा रुधिरबिंदु जर एकहि भूवर पडला
नसे कुणीहि कृष्णा त्यांते घरावया तळहाती
आगआग पदतळिची होइल सर्वसहाही धरती.

नको पुन्हा तो नाद घुमवु तूं, करी आपुले काळे
गळचात घालुन गळा राहु दे ही जननीची वाले.

(पान ४८५ वरून)

परंतु त्याचं उत्तर आलं, " नाही रे बाबा, घरीच जायला हवं. "

मग मी त्याला म्हटलं, " तुझी नेहमीची रीत दुसऱ्यांना ओढून, आग्रह करून खेळायला न्यायची. मग आजच एवढी विरक्ती का ? " आणि हे म्हणत असताना माझ्या ध्यानात आलं, पहिल्या तारखेला याचा नकार ठरलेला आणि मग त्याला मी म्हणालो देखील, " पहिल्या तारखेला तू कधी खेळायला येत नाहीस, हे आता मला आठवलं. बायकोनं सक्त ताकीद दिली आहे वाटतं, पगाराच्या दिवशी नाकासमोरच्या रस्त्यानं सरळ घरी ये म्हणून ! "

" चलतोस घरी ? चल घरी चल. घरीच चहा घेऊ. मग......चल. "

" का ? पगाराच्या दिवशी कुणाला घरी आणू नकोस ही आज्ञा नाही वाटतं बाईसाहेबांची ? "

त्यानं काही उत्तर दिलं नाही. म्हणाला " चल. "

" विजयादशमी " १९-१०-६१

अनुक्रमणिका

७. एक टिपण : सॉमरसेट मॉम्

आज सॉमर्सेट मॉमचे नाव माहित नाही व त्याने लिहिलेले काहीच वाचले नाही असा वाचक विरळाच. त्याचे नाव लेखकांच्या प्रणालीमध्ये निरनिराळ्या नात्याने गोविले गेले आहे. उत्कृष्ट कादंबरीकार, यशस्वी नाटककार व कलावंत, लघुकथालेखक म्हणून तो जनतेसमोर वावरतो आहे. त्याची Of Human Bondage हिची आजच्या युगातील महत्त्वाच्या कादंबऱ्यांमध्ये गणना होते. इंग्रज प्रेक्षकवर्ग त्याच्या नाटकाचे नेहमीच कौतुक करीत असतो. दोनएक वर्षांपूर्वी हायनेमानने त्याच्या लघुकथांचा Altogether हा संग्रह प्रसिद्ध केला. व तेव्हापासून त्याला इंग्लिश मॉपसाँ म्हणून संबोधू लागले. 'नॅशने' काही वर्षांपूर्वी त्याची लघुकथांच्या चढाओढीत परीक्षक म्हणून योजना केली होती. अशा प्रकारचे मॉमचे चढते–वाढते यश आहे. आज केप थेरॉस येथे तो फ्रान्सच्या दक्षिण भागात राहिला. या ठिकाणी त्याने रमणीय निवास बांधला आहे. विशेष काम असेल अथवा इंग्लंडमध्ये त्याच्या एखाद्या नवीन नाटकाचा प्रयोग असेल तरच तो इंग्लंडमध्ये जातो. आणि नाही तर आपल्या रमणीय निवासात एकांतवास आणि शांतता याचे सुख तो अनुभवीत राहतो.

* * *

परंतु ही स्थिती त्याला सुखासुखी प्राप्त झालेली नाही. अपयश, अपमान, अवहेलना यांनी त्याच्यावर एकेकाळी शस्त्र धरले होते. त्यातच दारिद्र्याच्या खाईत त्याला भटकावे लागत होते. काम मिळावे म्हणून ठिकठिकाणी त्याला तोंड वेंडागत फिरावे लागत होते. अशाही परिस्थितीतून त्याला आपली लेखनकलेची हौस टिकवून धरावी लागत होती. पोटापाण्याचा प्रश्न डोळ्यांसमोर आ वासून उभा असतानाच त्याचे नाट्यलेखन चाललेले होते. शेवटी त्याचे एक नाटक स्टेज सोसायटीने बसवायचे ठरविले. पहिल्या प्रयोगाच्या वेळी मॉम बॉक्समध्ये होता. सगळे थिएटर मधूनमधून हसत होते. नाटकाचे व नाटककाराचे कौतुक करीत होते. परंतु या वेळेला नाटककाराची काय स्थिती होती ? त्याच्या पोटाला काहीच खायला मिळालेले नव्हते व खिशात एक कपर्दिकहि नव्हती. मनामध्ये येणारे विचार, तेही सुखाचे नव्हते. आज हा प्रेक्षक माझ्या नाटकाचे

कौतुक करतो आहे. परंतु उद्या ? माझी Liza of Lambeth प्रसिद्ध झाली त्यावेळी त्यांनीच तिचे कौतुक केले होते. परंतु नंतर—मी जगतो आहे की मरतो आहे याविषयी कुणाला देखील कदर नव्हती.

एकंदर जनसमूहाविषयी त्याला विश्वास वाटत नाही. आपण आलो ते जनतेची सहानुभूती होती म्हणून नव्हे. तिने तर माझ्याकडे लक्षही दिले नाही. त्यामुळे एकप्रकारची बेफिकिरी व बेदरकारपणाने वागण्याची वृत्ती त्याच्या ठिकाणी निर्माण झाली. तो फ्रान्समध्ये राहतो व एकांत त्याला आवडतो, ह्याचे कारण तरी हेच. आता लोक माझ्याजवळ येण्याचा प्रयत्न करतील. त्यांना दूर ठेवणे म्हणजेच त्यांना त्यांच्या अवहेलनेबद्दल प्रायश्चित्त देणे होय. सॉमर्सेट मॉमविषयी वैयक्तिक माहिती जनतेला अत्यंत थोडी आहे.

एक साक्षेपी संपादक नि एक प्रांजळ लेखक

Mouj Printing Bureau Publishers Prabhat Mouj Satyaktha Daily-Weekly-Monthly	Khatau Wadi, Girgaum, Bombay 4.

२० जुलै, १९४८

स. न. वि. वि.

आपले पत्र मिळाले. आपली कथा स्वीकारल्याचे कळविले होते. सत्यकथेच्या ऑगस्टच्या अंकात ती प्रसिद्ध होत आहे. कथेबद्दल अतिशय आभारी आहे.

आपले लेखन मी आवडीने वाचीत आलो आहे. श्री. पु. मा. भावे देखील अनेकदा आपल्या लेखनाविषयी आमच्यापाशी स्तुतिपर बोलले आहेत. 'सत्यकथे'-साठी त्याचा वारंवार लाभ व्हावा, अशी मनापासून इच्छा आहे. आपली अभिरुची चोखंदळ आहे, असे लेखनावरून खात्रीने वाटते. तेव्हा तिच्या निर्णयाशी बहुधा मतभेदाचा प्रसंग येणार नाही. तेव्हा आपल्या निबंध-कथा-लेखनाचे साह्य सत्यकथेला यापुढे वारंवार मिळावे, अशी विनंती या पत्राने करीत आहे.

तूर्त अधिक काही नाही. लोभ वृद्धिगत व्हावा, ही विनंती.

आपला
श्री. पु. भागवत

★ ★

नागपूर, ४-८-४८

श्री. रा. रा. श्री. पु. भागवत यांना

स. न. वि. वि.

आपलं पत्र मिळून दिवस तर बरेच झाले. माझ्याकडून उत्तर लिहिण्याला दिरंगाई, बरीच झाली. ती आहे सकारण. पण सकारण असली तरी क्षमा मागणं हे माझं कर्तव्य आहे. व ती आपण उदार अंतःकरणानं कराल अशी आशाही आहे.

ता. २० जुलैच्या पत्रात आपण जी सुजनता प्रकट केली व "सत्यकथे"त लिहिण्याबाबत जे आमंत्रण दिलं त्याबाबत मी आपला अत्यंत आभारी आहे.

मी आपल्याकडे पाठविलेलं साहित्य, आपल्याला मान्य नसताही आपण ते स्वीकारावं हा माझा आग्रह कधीच राहणार नाही. निस्संकोच मनानं आपण ते माझ्याकडे परत पाठवावं असंच मी म्हणेन.

१ जानेवारी १९५६

वर्षाचा शेवट झाला तो Three coins in the Fountain ने आणि सुरुवात झाली तो Anna ने. कालच्या चित्रपटात रोम खूब पाह्यला मिळालं. Anna मी आज तिसऱ्यांदा पाहत होतो. Coins in the Fountain वाचायला घेतलं. सायंकाळी कृष्णाकुमारीच्या तालमीला जाऊन बसलो. घरी येताना केसरीचा अमृतमहोत्सव अंक आणला. मोडक्या बाजाराकडे गेलो. National Geographical Magazine चे खास अंक मोरोपंताच्या आर्याभारताचा १ ला भाग घेतला. झोपण्या अगोदर मौजेतला माणूस वाचला.

पण मला एक विचारावंसं वाटतं. लेख आपल्याकडे पाठविले तर किती स्वीकारू शकाल ? कारण ते 'सत्यकथे'ला भारभूत व्हावे ही माझी इच्छा नाही. त्यामुळे वर्षातून साधारणपणे किती निबंध वा लघुकथा आपण प्रकाशनाकरिता स्वीकारू शकाल ते जर आपण सांगू शकाल तर बरं होईल. अर्थात हे तुम्हाला शब्दात बांधून घेण्याकरिता नाही. हे माझ्या मार्गदर्शनाकरिता आहे.

आपण माझ्या लेखनावरून माझ्या वृत्तीविषयी जी कल्पना केली आहे ती सत्य व्हावी हाच माझा प्रयत्न. पण मतभेदाचा प्रसंग येणारच, येणार नाही अशातला भाग नाही. कारण माझे विषयही वैयक्तिक व मांडणीहि वैयक्तिक. विषयांना मी सर्वसामान्य रूप देण्याचा प्रयत्न करतो. पण यातही इतरांच्या वैयक्तिक अपेक्षा असतातच. ही स्थिति असल्यामुळे निर्णय विरुद्ध आला तरी त्याची मला खंत नाही. गंमत म्हणून मी तुमच्याकडे एक निबंध व एक कथा पाठवतो. बघा तुम्हाला काय वाटतं ते ! हे साहित्य आपण प्रसिद्ध केलंच पाहिजे हा माझा आग्रह नाही. करावंसं वाटलं तर पहा. न वाटलं तर परत पाठवा. पुन्हा आपले आभार मानतो.

मला अजून सत्यकथेचा अंक मिळाला नाही. बहुधा पोस्टात गहाळ झाला असावा.

गो. रा. दोडके

७–८–४८

एका प्रकाशकाचे आभार

ह. वि. मोटे प्रकाशन ३, वेस्ट व्हयू, नप्पू रोड, दादर, मुंबई १४

१५-९-५८

श्री. दोडके यांस स. न. वि. वि.

आपला प्रत्यक्ष परिचय नसतानाही आपण मला ज्या सहानुभूतीने वागविले, ज्या तत्परतेने या "पत्र साहित्याची" प्रत्यक्ष मदतही केली, त्यावद्दल मी आपला मनःपूर्वक आभारी आहे.

माझ्या स्वाधीन केलेल्या पत्रातील ५-६ पत्रे मी कॉपी करून घेत आहे. ते काम पूर्ण होताच मूळ पत्रे काळजीपूर्वक आपणास परत पाठवीन.

श्री. चोरघडे यांच्या तर्फे आपला परिचय झाल्यामुळे मी आपणाला परका म्हणून मानू शकत नाही. म्हणून मी आपणाला एक कबुली देतो की आपण भेट दिलेले पुस्तक मी अजून उघडले नाही. पुढील आठवडयात जरूर वाचीन. वेळेचा अभाव वगैरे शिष्टपणाच्या सबबी मी तुम्हाला तरी सांगू शकत नाही. पण सध्या मूड नाही एवढेच. याचा आपण राग मानू नये.

गेल्या मंगळवारी "प्रतिमा" माझे नवे प्रकाशन र. बुकपोस्टाने आपणाकडे सादर भेट म्हणून पाठवीत आहे.

ह्या पत्र-साहित्याच्या कामाकडे आपले लक्ष राहीलच व आपणाकडून सूचनाही याव्यात, अशी माझी स्वाभाविकच अपेक्षा आहे. असो, कळावे, लोभ असावा हे विनंती.

आपला,

ह. वि. मोटे

मृत्युलेख

१.	शब्दरंजन—पु. भा. भावे	मे	१९६३
२.	सत्यकथा—के. ज. पुरोहित	मे	१९६३
३.	महाराष्ट्र—श्री. दि. व. पंडित	१६ फेब्रु.	१९६३
४.	,, —श्री. मा. नी. गलगलीकर		
५.	अजातशत्रू गोविंदराव दोडके—श्री. आनंद जोग		
६.	तरुणभारत, नागपूर—श्री. ना. रा. शेंडे	१ ,,	१९६३
७.	स्मृति अंक—देशसेवक-सं. अळेकर फडणवीस—जानेवारी		१९६४

एक वाचनाचे वर्ष १९४०

(१) का.–श्रीकांत तृ. प. ९–१–४०. (२) का.-श्रीकांत प्र. प. २४–१–४०. (३) का.–चरित्रहीन २३–२–४०. (४) का.–अनलज्वाला ७–३–४०. (५) च.–काही म्हातारे व एक म्हातारी १८–३–४०. (६) का.–उद्धार. (७) च.–Autobiograpby by M. Gandhi, My Experiments with Truth–M. Gandhi २९–४–४०. (८) का.–Helene–Vicki Baum. (९) का.–Ragged Banners–Mannin, १३–५–४०. (१०) का.–भटक्या, १९–५–४०. (११) दुहेरी जीवन, २७–५–४०. (१२) कथा–रातराणीची फुले, २७–५–४०. (१३) इतिहास-पंजाबचा लढवय्या शीख, ३१–५–४०. (१४) का.–The Growth of the Soil, २–६–४०. (१५) च.–Insanity Fair Douglas Reid, १५–६–४०. (१६) कथा–Kiss–Karolina Soutla. (१७) निबंध–शेजवलकरांचे लेख. (१८) ना.–Penelope : Maugham, २८–६–४०. (१९) का.–Illysian Spring–Ann Bridge, १०–७–४०. (२०) कथा–आदिमाया–वनमाली, १२–७–४०. (२१) निबंध–Materlinck's Symbolism, १२–७–४०. (२२) कथा–वल्लरी– डॉ. धनीराम प्रेम, १७–७–४०. (२३) का.–निष्कलंक–कमल दीक्षित, २८–७–४०. (२४) का.-Madame Chrysan Thememe–Pierreloty, ६–८–४०. (२५) कथा–वडी दीदी, ९–८–४०. (२६) का.–विषवृक्ष–बंकीमबाबू. १९–८–४०. (२७) विविध नि.–नारी का मूल्य–शरद्‌बाबू, २२–८–४०. (२८) Encyclopaedia of Sexual Knowledge–Norman Haine. (२९) का.–दत्ता–शरद्‌बाबू, १४–९–४०. (३०) ना.–Mrs. Warren's Profession, ८–१०–४०. (३१) का.–पथके दावेपर, ९–१०–४०. (३२) का.–उन्माद, १९–१०–४०. (३३) ना.–Editor Bjornson. (६४) नि.–जगातील समाजक्रांती व हिंदुस्थान खैर. (३५) ना.–Showed of the Glen–Synge. (३६) ना.–Tchehor, Three Sisters, Ivanov, A Swan Song. (३७) का.–An Unwilling Martyr. (३८) का.–पाणकळा–र. वा. दिघे, २५–११–४०. (३९) निबंध–The Anniversary on the High Road, The Wedding, १९–११–४०. (४०) का.–See How They Run–Gerard Tickell, १९–११–४०. (४१) नि.–Drama, Ashley Cecil–Dukes. (४२) च.–Halt Way–Roberts. (४३) ना.–Mary Magdalana Materlinck, ६–१२–४०.

अनुक्रमणिका

कै. दौडके यांच्या लेखनाची सूची

लघुनिबंध—(१) तुम्ही ह्या नाही...मग... तरी काय? (२) Le Boheme. (३) सिगारेट (४) आहे का एखादा रोशफोकल्ड, (५) रोजनिशी. (६) सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयातील पुस्तके, ११ मे १९३५. (७) अकोला व नागपूर (८) माझा अभ्यास (९) ग्रंथसंग्रह, १४ ऑगस्ट १९३४. (१०) एक जानेवारी १९३५. (११) मोल. (१२) कॅलेंडर, घडचाळ आणि पुस्तके. (१३) Au Revoir, १० जानेवारी १९३५. (१४) मोराचे पीस, फेब्रुवारी १९३७, सह्याद्रि. (१५) ज्याचं त्याचं वेगळं वेगळंच, फेब्रुवारी १९३७. (१६) उगाच काही तरी, आक्टोबर १९३६. (१७) गाई व सौंदर्यप्रसाधने. डिसेंबर १९३६. (१८) दुःखाचा अभाव, जून १९३६. (१९) अज्ञानाचे कौतुक, सप्टेंबर १९३६. (२०) बुरखा. (२१) मेंटवस्तू, नोव्हेंबर १९३७. (२२) अरेरे माझी पिलं! डिसेंबर १९३७. (२३) मूळच्याच...नव्हत...पण, डिसेंबर १९३७. (२४) पोरीच्या जातीला, डिसेंबर १९३७. (२५) स्वप्न, ज्योत्स्ना. (२६) गैरसमज, मे १९३८. (२७) माणुसकी, जानेवारी १९३८ ज्योत्स्ना. (२८) ओळख, मार्च १९३८. (२९) Laughing Gallery, मार्च १९३८. (३०) केव्हा केव्हाचा आनंद, मातृभूमि. (३१) लहरी सौंदर्य. (३२) सूड. 'आदेश' दिवाळी अंक (३३) एकच सिगारेट आणि पुस्तक, आक्टोबर १९३८, ज्योत्स्ना. (३४) उधळचा, नोव्हेंबर १९३८, चित्रा (३५) कल्पनेतला आनंद आणि वास्तवातला. (३६) निदान नावं ठेवताना तरी. (३७) खोली, कपडे व मुलें, मे १९३६. (३८) आऽऽऽयेऽ होऽऽ वसंऽऽत, सप्टेंबर १९३८. (३९) मांडण, फेब्रुवारी १९३९. (४०) कीलार, मार्च १९३९. (४१) त्याचा काव्यसंग्रह, मार्च १९३९, सह्याद्रि. (४२) "महात्मा" म्हणा, एप्रिल १९३९. (४३) माणसाला मुले, मे १९३९, चित्रा. (४४) पावसांतून, जुलै १९३९, चित्रा (४५) प्रवासी, मे १९४१, चित्रा. (४६) पलंगावरून, जानेवारी १९४०, चित्रा, (४७) वीरपुरुषा, एप्रिल १९४०. (४८) सम्राट कवे, मे १९४०. (४९) जगात आलो आहो तर, सप्टेंबर १९४१, रेखा. (५०) क्षितिज, सप्टेंबर १९४०, चित्रा. (५१) मेल्यावर. (५२) न कोमेजणारं फूल, समीक्षक. (५३) भोलानाथ, चित्रा. (५४) आर्गसचे डोळे व चोरांच्या प्राप्तीवरील कर, जानेवारी १९४१, चित्रा. (५५) शब्दसृष्टीच्या परमेश्वरांना, जानेवारी १९४१, तरुण भारत. (५६) ट्रॅजेडी व कॉमेडी, जानेवारी १९४१. (५७) अनामिक, जानेवारी १९४४, भवितव्य. (५८) तपस्वी, डिसेंबर १९४१. (५९) स्वाक्षरी व संदेश, एप्रिल १९४१. (६०) कालिदास व भवभूति, पूजा. (६१) भवितव्य, अभिरुचि. (६२) काकाबाबू, फेब्रुवारी १९४२, भवितव्य. (६३) तारे व ग्रहांची वाटणी, फेब्रुवारी १९४२, भवितव्य. (६४) छत्री, मेणवत्ती व माणूस, आदेश. (६५) लाज,

एप्रिल १९३९. (६६) पडल्याची बाजू, आक्टोबर १९४४. (६७) मरणेही मुश्किल, मार्च १९४६, मातृभूमि. (६८) क्षणांचे चरित्र, फेब्रुवारी १९४५, अभिरुचि. (६९) नाटक, अभिरुचि. (७०) घरटे, अभिरुचि. (७१) सापेक्षता, आक्टोबर १९४८, नवभारत दिवाळी अंक. (७२) आत्मा हरवला तर, अभिरुचि. (७३) अलंकार, हंस (७४) नाण्यांचा निर्णय. (७५) निंदकाचे घर. (७६) आत्मनिवेदन, हंस. (७७) केवळ गुणगुणायला, अभिरुचि. (७८) एकाच औषधाचा डॉक्टर, समाधान (७९) स्मृति, जानेवारी १९४८, समाधान (८०) आईची जात, अभिरुचि (८१) घड्याळातील काटे, आक्टोबर १९४९. (८२) शेजारधर्म, एप्रिल १९४९. (८३) प्रासाद, जानेवारी १९४९. (८४) चरखाच कां ?. जुलै १९४८. (८५) जीवन आणि साहित्य, फेब्रुवारी, १९४८, सुषमा. (८६) वाणी, ऑगस्ट १९४८. (८७) कौतुक, मार्च १९४८, समाधान. (८८) रंगभूमीचा टीकाकार, नोव्हेंबर १९४७, (८९) लक्ष्मीपूजन दिन, सत्यकथा. (९०) कोलंबस, नोव्हेंबर १९५३, मनोहर. (९१) हानी, सत्यकथा. (९२) टाकलं बोलून, सत्यकथा. (९३) साझे खुपमस्करे, मनोहर. (९४) The man who was Shakespere. (९५) असतं एक मानतो दुसरं. (९६) कोणे एके काळी. (९७) गाऱ्हाण्यांचा निरास, सप्टेंबर १९३५, स्वच्छंद. (९८) आजची तरुण पिढी, आक्टोबर १९३५, स्वच्छंद. (९९) मुलीचा फोटो. (१००) सुशीची गोष्ट, मे १९३८. (१०१) तृण आणि पाखरे, आक्टोबर १९४६ (१०२) सभा, मार्च १९४९. (१०३) शरीर-मनाचे मंदिर, नोव्हेंबर १९४९.

लघुकथा—(१) अजाण (२) भरून आलेले डोळे (३) कलासक्त, फेब्रुवारी १९३६ (४) देवाचे नाव, जानेवारी १९३५. (५) राणी. (६) पोराचं मन, डिसेंबर १९३४. (७) जीवन (८) वेदना (९) संसारातील वसंत (१०) शिस्त. (११) म्हाताऱ्याचा मृत्यु, नोव्हेंबर १९३४. (१२) भारावलेले हृदय, मे १९३५ (१३) मनाची भिंती मे १९३६ (१४) प्यार, आक्टोबर १९३६, ज्योत्स्ना (१५) वेड्याचा मार्ग, एप्रिल १९३६, ज्योत्स्ना (१६) पानविड्याचे दुकान, जानेवारी १९३३ (१७) प्रेतांची सकाळ. (१८) नीति-अनीति, मे १९३३ (१९) मी घेतलेला जीव. (२०) आईचे पाप. (२१) भाऊ (२२) सुटका, सत्यकथा. (२३) त्यांची आठवण, डिसेंबर १९३६, सत्यकथा. (२४) हेवादावा, मार्च १९३६, संजीवनी (२५) घरची गोष्ट, जून १९३३, संजीवनी. (२६) सोयकोशा, जून १९३४ (२७) फौंटनपेन. (२८) पिसाळलेले कुत्रे, जून १९३७, ज्योत्स्ना (२९) परका, आक्टोबर १९३७, सत्यकथा. (३०) श्रमाला मोल नाही अशी गरिबी, मातृभूमि (३१) स्वर्गातली बायको, नोव्हेंबर १९३७. (३२) देवांचे मरण, सप्टेंबर १९३४, विहंगम. (३३) सायंकाळ, जानेवारी १९३७, सत्यकथा. (३४) म्हातारा. (३२) स्वयंसेवक, जानेवारी १९३७, युगवाणी

(३६) सांगाडा, नोव्हेंबर १९३८, अभिरुचि. (३७) पास बुक, सत्यकथा. (३८) स्मशानात मरणारा माणूस, अभिरुचि. (३९) संशय, मे १९३८, चित्रा. (४०) आळ, युगवाणी. (४१) नोकर, जुलै १९३८, सह्याद्री. (४२) सापडलेला रुपया, मे १९३९, चित्रा (४३) अनुभव, सत्यकथा. (४४) राक्षस, डिसेंबर १९३९, चित्रा. (४५) पत्रातील नाव. (४६) आश्रित, मे १९३८. (४७) पिशाच्च, जुलै १९४१ चित्रा. (४८) भाऊबीजेची आसवं, चित्रा. (४९) आजी, (ओढाताण), समीक्षक (५०) न्याय, आक्टोबर १९४१. (५१) एकाच गावची दोघं. (५२) शेवट. (५३) कथानायिका ,जुलै १९४६, अभिरुचि, (५४) ४२ चा कैदी. (५५) मिरवणूक, ऑगस्ट १९४६. (५६) शमन, मे १९४७. (५७) झोप, डिसेंबर १९४७, सत्यकथा. (५८) रांडलेकानं वजीस ठेवलं, डिसेंबर १९४७, अभिरुचि. (५९) जगाचा जन्म, डिसेंबर १९४७, सुषमा. (६०) कोट, सप्टेंबर १९४८, सत्यकथा. (६१) अपरिचित, फेब्रुवारी १९४८, हंस. (६२) मंदा आणि कालिंदी, आक्टो-वर १९४६, (६३) मखमालीचा पडदा, ऑगस्ट १९४८. (६४) पूजा, सप्टेंबर १९४८. (६५) अपरिचित, जुलै १९३९, सत्यकथा. (६६) पोरं खाते, मे १९५२. (६७) राधामाई, सत्यकथा. (६८) डोकेदुखीचं मोल, सप्टेंबर १९५२. (६९ दिव्यं देहि मे चक्षुः, एप्रिल १९५२. (७) दुतोंडे मन, मार्च १९५१. (७१) समाधान, सप्टेंबर, १९५३.

परीक्षणात्मक—(१) पिचलेला पावा. (२) संजीवनी (३) कोल्हटकरांचे आत्मचरित्र, ऑगस्ट १९३५. विश्ववाणी (४) सामाजिक सीमोल्लंघन, वसुंधरा. (५) रजपुत संस्कृति, सावधान. (६) रजपुतांचा उदय व ऱ्हास. (७) हवन मखमालीचा पडदा, पूजा. (९) साने गुरूजींचे चिंतनिका, नवभारत मे १९४८.

नाट्यप्रवेश— (१) पडदे–फुलोर. (२) गरिबी–चित्रा, डिसेंबर १९४१ (३) काळोख–चित्रा, जानेवारी १९४२. (४) नेता १, २, ३,–भवितव्य, एप्रिल १९४२, (५) महाभि निष्क्रमण–विजय. (६) अभिलाषा–मे १९३८. (७) आत्मे –चित्रा. (८) प्रेम नाटक–चित्रा, नोव्हेंबर १९४०. (९) देवनांम प्रिय–भवितव्य, मार्च १९४२. (१०) हात लावला की, युगवाणी, नोव्हेंबर १९४५. (११) बागेतील सकाळ.

प्रवासवृत्त-- (१) दौलताबाद. (२) अमरकंटक–सत्यकथा.

जीवनरेखा— (१) तपस्वी (२) महावृक्ष (३) बावूजी (४) न कोमेज-णारं फूल. (५) जगात आलो आहो तर. (६) टांगेवाला मेरा वाप है. (७) आवा (८) रोमाँ रोलाँ (९) सिग्रिड उण्डसेट.

पारिजात—श्री. वि. स. खांडेकर संपादित लघुनिबंधसंग्रह (१९५२). कै. गो. रा. दो. चे तीन निबंध समाविष्ट–उथळपणा, सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयांतील ग्रंथ, अनामिक.

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ यांजकडून—

नाट्यसमिती—

१ खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा

दि. १८, १९ आणि २० जानेवारी ६६ रोजी रात्रौ ९ वा. धनवटे रंग-मंदिरात खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा घेण्यात आली.

यावर्षी–इंजिनियरिंग कॉलेजने 'तीन चोक तेरा' (ले. श्याम फडके), मेडिकल कॉलेजने 'भटाला दिली ओसरी' (ले. मो. ग. रांगणेकर) आणि शासकीय विज्ञान महाविद्यालयाने 'ससा आणि कासव' (ले. शं. गो. साठे) ही तीन नाटके सादर केली.

शा. विज्ञान महाविद्यालयाने सादर केलेल्या 'ससा आणि कासव' या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे त्या महाविद्यालयाला फिरती रौप्यढाल मिळाली. याच नाटकात श्रीधरची भूमिका करणारे श्री. राजा स्मार्त यांना आणि उषाची भूमिका करणाऱ्या कु. प्रतिभा मुळे यांना अभिनयाचे वैयक्तिक पारितोषिक (प्रत्येकी रु. २५) मिळाले.

परीक्षक म्हणून सौ. अनसूयाबाई वाडेगावकर, श्री. शरद परुळकर आणि प्रा. यादवराव वडस्कर यांनी काम केले.

२ लिटल थिएटर, मुंबई, यांनी वि. सा. संघाकरिता दि.२२ जानेवारी रोजी सायं. ७ वा. 'चिनी बदाम' (ले. पु. व्यं दारव्हेकर आणि सौ. सुधा करमरकर) आणि दि. २३ जानेवारी रोजी दुपारी ३ वा. 'हं हं आणि हं हं हं' (ले. दिनकर देशपांडे) ही दोन नाटके सादर केली.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला

दि. १९, २०, २१ जानेवारी ६६ रोजी कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. यावेळीं पद्मश्री प्रा. अनंत काणेकर यांनी 'ललित-वाङ्मयाचा आद्य हेतू', 'ललित वाङ्मयातील नवे–जुने' आणि 'ललित वाङ्मयाचा आनंद' या विषयांवर व्याख्याने दिली.

कवि आणि नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा ४७ वा स्मृतिदिन

दि. २३ जानेवारी ६६ रोजी सकाळी १० वा. कवि आणि नाटककार कै. राम गणेश गडकरी यांचा ४७ वा स्मृतिदिन समारंभ सावनेर मुक्कामी साजरा

करण्यात आला. सावनेर येथे नियोजित वक्ते प्रा. भालचंद्र फडके (अमरावती) यांचे सुश्राव्य भाषण झाले. नागपुराहून प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. बाबुराव चिमोटे, श्री. म. ल. देशमुख, श्री. मा. नी. गलगलीकर, श्री. र. वि. कुळकर्णी आदि कार्यकर्ते आणि वि. सा. संघाचे पदाधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

दि. २३ जानेवारी ६६ रोजी सायं. ७ वा. विदर्भ साहित्य संघातर्फे कै. राम गणेश गडकरी यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. भालचंद्र फडके यांचे 'गडकरी यांचे नाटच-संवाद लेखन' या विषयावर विचार परिप्लुत भाषण झाले.

परीक्षा समितीवृत्त

जानेवारी सत्राच्या परीक्षा दि. २२ आणि २३ रोजी पार पडल्या. या सत्रात सर्व परीक्षांना एकूण १७८० विद्यार्थी परीक्षेस बसले. केंद्रसंख्या ५१ होती.

ऑगस्ट आणि जानेवारी या दोन्ही सत्रात एकूण २८९९ विद्यार्थी परीक्षेस बसले.

इ. स. १९६४-६५ मध्ये दोन्ही सत्र मिळून केवळ १९३१ विद्यार्थी परीक्षेस बसले. तुलनात्मक प्रगतीचा आलेख काढल्यास ९६८ विद्यार्थी मागील वर्षापेक्षा, म्हणजे ६५-६६ साली अधिक बसले, असे आढळून येईल.

सर्व केंद्राधिकाऱ्यांनी यावेळी जे सहकार्य दिले त्याबद्दल परीक्षा समितीतर्फे आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

नागपूर
१ फेब्रुवारी ६६

ग. स. देशपांडे
संचालक, परीक्षा समिती

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

* कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा *

बुधवार दि. २ फेब्रु. ६६ रोजी रात्रौ ८–३० वा. : तीन एकांकिका

१. श्रीमती बिंझाणी महिला विद्यालयातर्फे

चित्रगुप्त अहो चित्रगुप्त

२. राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय धरमपेठ शाखेतर्फे

पांडवप्रताप (ले. कै. पद्माकर डावरे)

३. मोहता सायन्स महाविद्यालयातर्फे

सदू आणि दादू (ले. श्री. पु. ल. देशपांडे)

गुरुवार दि. ३ फेब्रु. ६६ रोजी रात्रौ ८–३० वा. : तीन एकांकिका

१. विश्वेश्वरय्या रिज. इंजिनियरिंग महाविद्यालयातर्फे

नाटक बसते आहे (ले. श्री. वि. वा. शिरवाडकर)

२. आयुर्वेद महाविद्यालयातर्फे

कोणी गोविंद घ्या (ले. कै. पद्माकर डावरे)

३. फुलसिंग नाईक महाविद्यालयातर्फे

प्रेक्षकांनी क्षमा करावी (ले. श्री. वसंत सवनीस)

शुक्रवार दि. ४ फेब्रु. ६६ रोजी रात्रौ ८–३० वा. : तीन एकांकिका

रंजन कला मंदिरातर्फे

कागदाच्या भिंती (ले. श्री. वि. वा. शिरवाडकर)

२. धरमपेठ महाविद्यालयातर्फे

दादा ! भाई ! नवरोजी (ले. कै. पद्माकर डावरे)

धनवटे नॅशनल महाविद्यालयातर्फे

सदू आणि दादू (ले. श्री. पु. ल. देशपांडे)

स्थळ--धनवटे रंगमंदिर (वि. सा. संघ)

तिकीट दर—रु. २, १ आणि ५० पैसे

मुद्रक पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता.